मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | मंगळवार, २६ ऑगस्ट २०२५ | वर्षः १ | अंक:८५ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## नरिमन पॉईंट येथे समुद्रात तरुणीचा मृतदेह सापडला

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

मरिनड्राईव्ह परिसरातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. नरिमन पॉईंट येथील समुद्रात एका तरुणीचा मृतदेह सापडल्याची घटना घडली आहे. शिवाय या तरुणीच्या चेहऱ्यावर जखमेच्या खुणा देखील दिसून येत आहे. घटनेची माहिती मिळताच कफ परेड पोलिसांनी घटनास्थळ गाठत पुढील तपास सुरु केला आहे. मात्र हि हत्या आहे कि आत्महत्या हे अद्याप कळू शकलेलं नाही. सध्या पोलीस या घटनेचा त्या दिशेने तपास करत असून या घटनेने परिसरात एकाच खळबळ उडाली आहे.

अग्रलेख

## खरीखरी

## भारताची आपली शहरे, हरे हरे हरे...

आपल्या भारताची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात सुजलेली आहे. आता आपण चीनलाही मागे टाकलेले आहे म्हणजे चीन पेक्षा कमी भूभाग असलेल्या भारताची लोकसंख्या चीन पेक्षा जास्त आहे. विशेष म्हणजे अमेरिकेची गोष्ट तर सोडाच कारण अमेरिकेची जमीन भारतापेक्षा अडीच पट जास्त आहे आणि भारताची लोकसंख्या अमेरिकेच्या पाचपट जास्त आहे. महात्मा गांधी यांच्या काळात भारत हा सहा लक्ष खेड्यांचा देश होता आता अनेक खेड्यांच्या रूपाचे परावर्तन शहरांमध्ये झालेले आहे खेड्यातील चांगली अर्थव्यवस्था असलेले किंवा जास्त हुशार असलेले अनेक तरुण एक तर स्वतः एकटे नाहीतर कुटुंबासह या शहरीकरणात सामील झालेले आहेत. भारतातील लोकसंख्या ४०% शहरी झालेली आहे, महाराष्ट्राचे प्रमाण तर याहूनही जास्त असेल. मुंबईच्या आसपासची सर्व खेडी दोन-तीन जिल्ह्यांमधील दहा ते बारा महापालिकांनी अक्षरशः गिळंकृत केलेली आहेत. एकेकाळी शहरातील उत्पन्नापेक्षा खेड्यातील उत्पन्न जास्त होते आता उत्पन्नाच्या बाबतीत शहरांचा वाटा ७० टक्के पर्यंत गेलेला आहे म्हणजेच ४०% शहरी लोकांचे उत्पन्न ६०% ग्रामीण भागातील उत्पन्नापेक्षा दुपटीने जास्त आहे. एकूणच आपल्या विकासाची गंगा शहरात वाढत चाललेली आहे. पण... हा पणच अत्यंत महत्त्वाचा आहे. शहरे जसजशी वाढली तसतसे शहरीकरण अनियोजित झाले त्यात फक्त मुंबई आणि पुण्याचे उदाहरण घ्या. १९६५ पर्यंत मुंबईचा मुंबईमधील सडका दररोज पाण्याने धुतल्या जात होत्या. आता या दोन शहरांचा बकालपणा कितीतरी प्रचंड प्रमाणात वाढलेला दिसतो अशीच परिस्थिती जर इतरही लहान मोठ्या शहरांची आहे. शहरातील नागरिकांना पायाभूत सुविधाही अत्यंत दर्जाहीन दिल्या जात आहेत असे खेदाने म्हणावेसे वाटते, वाहतुकीचे म्हणाल तर तिथेही बारा वाजलेले आहेत. वाहनतुंबी (मुंबईच्या भाषेत ट्रॅफिक जॅम) इतकी वाढलेली आहे की शहरातून गाडी चालवणे दूर्धर झालेले आहे. जुनाट गाड्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. त्यासोबतच आज-काल बऱ्याच शहरांमध्ये आपले घर वातानुकूलित करण्याचा एक प्रयोग सुरू असतो त्यामुळे किती किती कार्बन आपण उत्सर्जित करतोय याचा कोणी विचार करत नाही. तो कार्बन बाहेरच्या लोकांसाठी तापमान वाढवतो या प्रदूषणा बाबत सरकार कधी बोलणार आहे का? त्यातच अति पावसामुळे शहरांमध्ये नियोजन व्यवस्था पूर्णपणे ढासळते गल्लोगल्ली घाणींचे डोंगर तयार होताना दिसतात. उन्हाळ्यात तर उष्णतेची परमावधी होते, त्याला वातानुकूलित घरे कारणीभूत आहे असे आम्ही वर म्हटलेलेच आहे. आपण जगातील सर्वाधिक जनसंख्या असलेला सर्वाधिक समस्याग्रस्त देश आहोत, हे आपले सरकार मानायलाच तयार नाही. आपल्या देशातील वाढते शहरीकरण नियोजित नसल्यामुळे या शहरांमध्ये जो कर्णकर्कश्श आवाज हॉर्न मधून येतो आणि भर रस्त्यात जोरात वाजणाऱ्या डीजे आणि बँड मुळे आवाजांचे प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. शहरातील झोपडपट्ट्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत प्रत्येक शहरात बेकायदेशीर बांधकामे आहेतच. जगातील सर्वात प्रदूषण युक्त शहरांमध्ये भारताचा क्रमांक पहिला आहे. रस्ते बनवणारे अनेक ठेकेदार तीस ते चाळीस टक्के खर्चामध्ये रस्ते बनवतात बाकीच्या रकमेचे म्हणजेच त्या निधीचे काय होते हे आम्हाला अजिबात ठाऊक नाही. आपल्या देशात आणि राज्यात शहरी विकास मंत्रालय आहे आपल्या मायबाप सरकारने २०१४ साली १०० शहरांना स्मार्ट बनवण्याचा संकल्प केला होता म्हणजे स्मार्ट सिटी बनवण्याचा संकल्प केला होता. त्यापैकी अवघे इंदूर सारखे एखादे शहर सोडले तर जिकडे तिकडे बोंबाबोंबच आहे. आपल्या देशाच्या शहरी विकासासाठी आवश्यक तेवढे धन सध्या आपल्याकडे उपलब्ध नाही. आता कर्ज काढण्याचीही परमावधी झालेली आहे. याचाच अर्थ शहरांचा वाली कोणीच नाही. त्यामुळेच आपली शहरे म्हणजे, हरे हरे हरे... हे खरे असले तरी आपण आशावादी राहू या.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## रोहित पवारांचे शिरसाटांविरुद्ध 12 हजार पानांचे पुरावे, राजीनाम्याची मागणी

गजानन तुपे

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सिडकोमध्ये झालेल्या पाच हजार कोटींच्या जमीन घोटाळ्याचा गंभीर आरोप केला होता. काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेत रोहित पवार यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आरोप करताना सांगितले की, सिडकोचे अध्यक्ष असताना शिरसाट यांनी मुंबईतील बिवलकर यांना सुमारे १५० एकर जमीन दिली आणि यामध्ये ५ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी आणि संजय शिरसाट यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी रोहित पवार यांनी केली होती. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी "असे आरोप रोज केले जातात, पुरावे द्या," असे म्हणत रोहित पवार यांनाच आव्हान दिले होते. आता रोहित पवार यांनी आज सोमवारी पत्रकार परिषद घेत तब्बल १२ हजार पानांचे बॅग भरून पुरावेच समोर आणले आहेत. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.



रोहित पवार म्हणाले की, मंत्री संजय शिरसाट यांनी सिडकोचे चेअरमन असताना हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला. याबाबत पुरावे आम्ही सादर केले. त्यानंतर आमच्यावर काही लोकांनी टीका केली की महादेव यांना बुद्धी देवो. एकनाथ शिंदे यांनी टीका केली. मला शिंदे यांना सांगायचं आहे की, महादेवाने आम्हाला बुद्धी दिली आहे. तिचा वापर करून आम्ही भ्रष्टाचार बाहेर काढला आहे. आम्हाला देवेंद्र फडणवीस म्हणाले पुरावे सादर करा. आम्ही त्यांना देण्यासाठी १२ हजार पानांचे पुरावे बॅग भरून आणले आहेत, असे त्यांनी म्हटले.

नवी मुंबईतील बिवलकर कुटुंबियांचा १९९२ साली १२ टक्के जमिनीसाठी अर्ज आला होता. त्यावेळी हा अर्ज फेटाळण्यात आला होता. दुसऱ्यांदा त्यांनी १९९५ साली अर्ज केला. तो देखील फेटाळण्यात आला होता. बिवलकर हे अंबसेंटी लँडलॉर्ड आहेत. त्यामुळे त्यांना १२.५ टक्के योजनेचा लाभ देता येणार नाही ही सिडकोची स्पष्ट भूमिका होती. हीच भूमिका सिडकोने घेतली आणि नगर विकास विभागाला पाठवले. १ मार्च २०२५ रोजी नगर विकास विभागाने बिवलकर यांना जमीन देण्याचे निर्देश दिले. या पत्रात ज्या मुद्यांचा उल्लेख करण्यात आला होता खरे तर ते मुद्दे बिवलकर यांच्या विरोधातील होते. मात्र तरीदेखील जमीन वाटप करण्यात आले आहे. बिवलकर यांना जमीन देता येत नाही हे सिडकोचे एमडी विजय सिंघल यांना लक्षात आले म्हणून त्यांनी सरकारला चेअरमन नेमा, असं सांगितलं. त्यानुसार संजय शिरसाट यांना सिडकोचे चेअरमन करण्यात आले आणि त्यांनी बिवलकर यांना जमीन दिली, असे रोहित पवारांनी म्हटले.

सर्वोच्च न्यायालयात प्रकरण सुरू असताना बिवलकर यांना जमीन कशी काय दिली? असा सवाल रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला. हे कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन आहे असं वाटत नाही का? जी 5 हजार कोटी रुपयांची जमीन दिली ती जमीन बिवलकर यांनी बिल्डरांना विकली. आता ही जमीन अडचणीत येणार आहे. त्या लोकांचे पुढे काय करणार आहात? ही जमीन तुम्ही माघारी घेणार का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला.

**१२ हजार पानांचे पुरावे सादर करतोय**

४८ तासात ३० ते ३२ टेबलवरून फाईल पुढे गेली आणि तत्काळ ५ हजार कोटी रुपयांचे भूखंड वाटप करण्यात आले. साडे बारा टक्के जमीन वाटप वर्षानुवर्षे होतं नाही. मग बिवलकर कुटुंबाची फाईल एवढ्या वायू वेगाने पुढे सरकली कशी? ट्रकभर पुरावे नाही, गाडी भरून पुरावे नाहीत तर बॅग भरून १२ हजार पानांचे पुरावे आम्ही सादर करत आहोत. शिरसाट यांना तत्काळ पदावरून बाजूला करा, अशी मागणी रोहित पवार यांनी यावेळी केली.

## 29 ऑगस्टपासून जरांगेंचे आझाद मैदानावर आमरण उपोषण

**जालना, दि. २५ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आणि कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला आहे. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर २९ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्यात येणार आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील हे गणेश आगमनादिवशी बुधवारी २७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अंतरवाली सराटीतून मुंबईकडे रवाना होणार असल्याचे सांगितले. ते आज तरवली सराटी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

अंतरवाली सराटी ते मुंबईच्या प्रवासात जरांगे पाटील आणि कार्यकर्ते बुधवारी २७ ऑगस्ट रोजी मुक्काम शिवनेरी येथे, तर २८ ऑगस्टला सकाळी चाकणहून लोणावळा, वाशी, चेंबूर मार्गे सायंकाळी आझाद मैदानावर पोहोचण्याची योजना आहे. दरम्यान माळशेज घाटाचा मार्ग टाळण्यात आला आहे. मुलांना त्रास होऊ नये म्हणून प्रवासाची काळजी घेतली जाणार आहे. त्यामुळे मुंबईतील हजारो रस्त्यांपैकी कोणताही एक रस्ता सरकारने आंदोलकांना आझाद मैदानापर्यंत दिला जावा, अशी मागणी देखील जरांगे-पाटील यांनी यावेळी केली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना जरांगे-पाटील म्हणाले की, आम्ही आमच्या मागण्यांवर ठाम आहोत. मराठा आणि कुणबी एक आहेत, हा अध्यादेश आम्हाला मंजुरीसह अंमलबजावणी करून पाहिजे. हैदराबाद गॅझेट लागून करून पाहिजे, तुम्ही कारणं सांगणार ते आम्ही ऐकणार नाही. आमच्या नोंदी सरकारी आहेत, त्याला विरोध करण्याचा विषय नाही. आमच्या नोंदी सरकारी



आहेत, त्याला विरोध करण्याचा विषय नाही. आमच्या सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी करून पाहिजे, त्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी राज्य सरकारला दिला.

मराठा आणि कुणबी एक आहेत, हा अध्यादेश मंजुरीसह अंमलबजावणी करावी, तसेच हैदराबाद गॅझेट लागू करावा, अशी प्रमुख मागणी आहे. सगे सोयरे कायद्याची दीड वर्ष झाली तरी अंमलबजावणी का केली नाही, असा सवाल करत सरकारच्या हातात आज फक्त दोन दिवस आहे. सरकारने महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील लोकांना वेठीस धरू नये. सरकारने आडमुठ्याच्या भूमिकेत जाऊ नये. मला उद्यापासून बोलायचं नाही. आता चर्चा बंद होणार आहे, असेही जरांगे पाटील म्हणाले.

## आमची आई रक्ताच्या थारोळ्यात पडली तेव्हा कुठे होतीस ?

### मनोज जरांगे चित्रा वाघांवर संतापले

**अंतरवाली सराटी दि. २५ प्रतिनिधी**

मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईविषयी काही बोललोच नाही. मी त्यांच्या आईवर कुठे आणि केव्हा बोललो. परंतु बोलण्याच्या ओघातून माझ्या तोंडातून तसा काही शब्द गेला असेल तर तो मी माघारी घेईन, असे वक्तव्य मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केले. पण मग देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांना आरक्षण द्यावे. देवेंद्र फडणवीस तुला लाज वाटली पाहिजे, तू मुख्यमंत्री आहेस. ज्या पोलिसांना सस्पेंड करायला पाहिजे होते, त्यांना तू मोठी पदं दिली. पोलिसांनी आमच्या आई-बहिणींना मारले तेव्हा त्या रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. तुझी आई तुला प्रिय आहे तशी आम्हाला आमची आई प्रिय आहे. तू मराठ्यांना आरक्षण दे तुझ्या आईची पूजा करतो, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले. ते सोमवारी अंतरवाली सराटी येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी २७ ऑगस्टला मराठा मोर्चा मुंबईकडे कूच करेल, असे सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांच्या रविवारच्या पत्रकार परिषदेनंतर चित्रा वाघ, प्रसाद लाड यांच्यासह भाजप नेत्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या आईला शिवी दिली, असे चित्रा वाघ यांनी म्हटले होते. याबाबत मनोज जरांगे यांना विचारले असता त्यांनी चित्रा वाघ यांच्यावर सडकून टीका केली. तू माझ्या नादी लागू नकोस. माझ्या नादी लागलीस तर तुझं सगळं गबाळ उचकीन. संध्याकाळपर्यंत तुझी सगळी माहिती माझ्याकडे येईल, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

ती जी बाई बोलली, कोण वाघीण तिला आमची आई रक्ताच्या थारोळ्यात पडली होती, तेव्हा दिसलं नाही का? तेव्हा तू कुठे होतीस. आमच्या तीन-चार वर्षांच्या पोरी रक्ताच्या थारोळ्यात पडली तेव्हा तू झोपली होतीस का? तेव्हा तुला कोणी दिसलं नाही का, तेव्हा तू कुठे गेली होती? आता तुझी जात जागी झाली. कवर तू खेटरं चाटतेस, माझ्या नादी तू लागू नकोस. तू बाई असशील तर आमच्याकडेही बाया आहेत. आमच्या आईवर ३०७ ची केस लागली, तुझ्यावर तशी केस केली तर चालेल का?, असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी विचारला. यावर आता चित्रा वाघ काय प्रत्युत्तर देणार, याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

## ट्रम्प यांच्या टॅरिफ बॉम्बनंतर भारत काय भूमिका घेणार ?

### पंतप्रधान कार्यालयाने बोलावली उच्चस्तरीय बैठक

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांचा जगातील अनेक देशांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. डोनाल्ड ट्रम्प कायम कोणत्या न कोणत्या कारणांवरून चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वीच ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली होती. त्यानंतर ६ ऑगस्ट रोजी पुन्हा एक मोठी घोषणा करत भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क (टॅरिफ) लादण्याची घोषणा केली होती. त्यामुळे अमेरिकेकडून भारतावर लावण्यात येणारे एकूण आयातशुल्क ५० टक्क्यांवर पोहोचलेलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफच्या निर्णयाचा भारताला मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल ट्रम्प प्रशासनाने भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लागलेलं आहे. हे अतिरिक्त टॅरिफ २७ ऑगस्टपासून भारतावर लागू होणार आहे. आता भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लागू होण्यासाठी अवघे दोन दिवस बाकी राहिले आहेत. त्याआधी आता भारत सरकार मोठं पाऊल उचलण्याच्या तयारीत असल्याचं बोललं जात आहे.

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयानुसार २७ ऑगस्टपासून भारतावर ५० टक्के आयातशुल्क लागू होणार आहे. त्यामुळे या संदर्भात भारताची भूमिका काय असणार? यावर चर्चा करण्याच्या अनुषंगाने मंगळवारी (२६ ऑगस्ट) पंतप्रधान कार्यालयाने एक उच्चस्तरीय बैठक बोलावली असल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीत भारत महत्वाचे काही निर्णय घेण्याची शक्यता आहे.

अमेरिकेत भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयातशुल्क आकारणीचा सामना करणाऱ्या भारतीय निर्यातदारांसाठी उपाययोजनांचा आढावा घेण्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान कार्यालयाने २६ ऑगस्ट रोजी उच्चस्तरीय बैठक बोलावली आहे. पंतप्रधानांच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षेखाली ही बैठक पार पडणार आहे. त्यामुळे या बैठकीत भारत कोणता मोठा निर्णय घेणार? याकडे अनेकाचं लक्ष लागलं आहे.

## सदाभाऊ खोत यांच्यावर गोरक्षकांकडून हल्ला

**पुणे, दि. २५ प्रतिनिधी**

पुण्यात गोरक्षकांकडून आमदार सदाभाऊ खोत यांना धक्काबुक्की करण्यात आली आहे. पुण्यातील द्वारकाधीश गोशाळेजवळ ही घटना घडली. आमदार सदाभाऊ खोत यांनी गोरक्षकांबद्दल एक वक्तव्य केलं आणि त्यानंतर आक्रमक होत गोरक्षकांनी त्यांना धक्काबुक्की केल्याचा प्रकार घडला.

पुण्यातील फुरसुंगी येथे द्वारकादास गौशाळेत ठिकाणी आमदार सदाभाऊ खोत हे कार्यकर्त्यांसोबत गेले होते. त्यावेळी काही गौरक्षकांकडून त्यांना धक्काबुक्की करण्यात आली. या प्रकरणी बोलताना सदाभाऊ खोत म्हणाले की, "राज्यामध्ये गोवंश कायद्याच्या आडोशाने शेतकरी दुधाळ जनावरं विकायला गेले तरी त्यांना मारहाण केली जाते, त्यांची जनावरे जबरदस्तीने नेली जातात. पोलीस



स्टेशनला ही जनावरे गेल्यानंतर ती गोशाळेत नेली जातात. त्यानंतर दिवसाला २०० ते ५०० रुपये आकारले जाते. याचा निकाल जर वर्षाने किंवा दीड वर्षाने लागला तर शेतकरी दंड भरू शकत नाही. त्यामुळे ती जनावरे तो माघारी नेत नाही. साताऱ्यातील कोरेगाव तालुक्यातील १० म्हशी आणि त्याची ११ पाडसे ही पुण्यातील द्वारकाधीश गोशाळेत आणण्यात आली होती. आज त्या म्हशी जाग्यावर आहेत की नाही हे पाहायला गेलो होतो. पण गोरक्षकांनी त्याला विरोध केला." दोन महिन्यांपूर्वी सांगलीच्या शेतकऱ्यांना मारहाण करून त्यांचा दहा म्हशी जबरदस्तीने फुरसुंगीच्या गोशाळेत नेऊन ठेवल्याचा आरोप केला जात होता. या प्रकरणी शेतकऱ्यांनी न्यायालयात जाऊन या म्हशी परत मिळवण्यासाठी आदेश मिळाले होते. तो आदेश घेऊन शेतकरी गोशाळेत म्हशी घेण्यासाठी गेल्यानंतर त्या म्हशी गोशाळेत नसल्याच लक्षात आलं. गोशाळेत या प्रकरणी विचारपूस केल्यावर त्या ठिकाणच्या गोरक्षकांनी उडवाउडवीची दिली. म्हशींना चरायला डोंगरावर सोडल्यावर त्या निघून गेल्याचे उत्तर गोरक्षकांनी दिले. याप्रकरणात शेतकऱ्यांची ना दाद ना फिर्याद अशी परिस्थिती झाली. त्यामुळे या गोरक्षकांवर कारवाई करावी अशी मागणी सदाभाऊ खोत यांनी केली आहे.

## वैभव खेडेकरांसह तीन जण मनसेतून बडतर्फ

**रत्नागिरी, दि. २५ प्रतिनिधी**

एकीकडे महापालिका निवडणुकांची मोर्चेबांधणी सुरु असतानाच मनसेच्या गोटातून एक मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कोकण संघटक व राज्य सरचिटणीस वैभव खेडेकर यांच्यासह तीन जणांना पक्षातून बडतर्फ करण्यात आले आहे. पक्षविरोधी कारवाईचा ठपका ठेवत ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून मनसे नेते वैभव खेडेकर हे भारतीय जनता पक्षाच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. काही दिवसांपूर्वी ते दापोलीमध्ये झालेल्या महायुतीच्या नेत्यांच्या सभेमध्येही दिसले होते. ज्यानंतर या चर्चा रंगल्या होत्या. त्यांना शिवसेना शिंदे गटातूनही ऑफर देण्यात आली होती. अशातच आता राज ठाकरे



यांच्या आदेशानुसार वैभव खेडेकर यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. तसेच ते भाजपमध्ये जाणार असल्याचीही चर्चा आहे.

वैभव खेडेकर यांच्यासोबतच अविनाश सौंदळकर (राजापूर, रत्नागिरी) संतोष नलावडे, (चिपळूण, रत्नागिरी) सुबोध जाधव, (माणगाव, रायगड) यांचीही पक्षातून हकालपट्टी केली आहे. आपण पक्षाच्या नियमांचे आणि धोरणांचे उल्लंघन केल्यामुळे, तसेच पक्षविरोधी कार्य केल्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.श्री. राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने तुम्हाला पक्षातून बडतर्फ करण्यात येत आहे. तरी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सर्व पदाधिकारी महाराष्ट्रसैनिकांनी याची नोंद घ्यावी, हि विनंती, असं या पत्रामध्ये म्हटले आहे.

दरम्यान, वैभव खेडेकर हे कोकणातील महत्त्वाचे आणि मनसेचे अत्यंत निष्ठावंत नेत्यांपैकी एक होते. राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेर पडून मनसेची स्थापना केल्यापासून ते पक्षामध्ये होते. त्यांनी दापोली मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवली होती, मात्र त्यामध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला. गेल्या अनेक दिवसांपासून ते पक्ष सोडणार असल्याची चर्चा होती. अशातच आता राज ठाकरेंनी त्यांची हकालपट्टी केली आहे.


## अभिव्यक्तीच्या नावाखाली वाट्टेल ते बोलण्याची मुभा नाही

### इन्फ्लुएन्सर्सना सर्वोच्च न्यायालयाचे माफी मागण्याचे आदेश

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने समय रैना व रणवीर अलाहबादिया याच्यासह काही सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स व युट्यूबर्सवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. समाजमाध्यमांचा वापर करून कमाई करणाऱ्या इन्फ्लुएन्सर्सचा कॉन्टेंट 'फ्री स्पीच' (बोलण्याचं स्वातंत्र्य) या श्रेणीत येत नाही. ते कमर्शियल स्पीच (व्यावसायिक वक्तव्य) मानलं जाईल, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. यासह न्यायालयाने स्टॅण्ड अप कॉमेडियन रैना व यूट्यूबर अलाहबादियासह इतरांना बिनशर्त माफी मागण्यास सांगितलं आहे.

समय रैनाच्या 'इंडियाज गॉट लेटेंट' या कार्यक्रमात रणवीर



अलाहबादिया याच्या एका टिप्पणीमुळे वादाला सुरुवात झाली होती. याप्रकरणी आता सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. समय रैना, विपुल गोयल, बलराज परमारजीत सिंह घई, निशांत जगदीश तंवर व सोनाली ठक्कर उर्फ सोनाली आदित्य देसाई यांनी दिव्यांग व्यक्तींविषयी असंवेदनशीलता दाखली होती. एका असंवेदनशील टिप्पणीला दाद दिली होती. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने या सर्व इन्फ्लुएन्सर्सना त्यांच्या यूट्युब चॅनेल व पॉडकास्टवर दिव्यांग व्यक्तींची बिनशर्त माफी मागण्याचे निर्देश दिले आहेत.

समय रैनाने त्याच्या कार्यक्रमात दोन महिन्यांच्या मुलाला झालेल्या स्पायनल मस्क्युलर अट्रॉफी अर्थात SMA या आजारावरील उपचारांसाठीच्या प्रचंड खर्चाबाबत चेष्टा केली होती. तर, आणखी एका कार्यक्रमात त्याने डोळ्यांची समस्या असणाऱ्या व्यक्तींबाबत बोलतानाही चेष्टा केली होती.

सर्वोच्च न्यायालयाने रणवीर अलाहबादिया याला देखील बिनशर्त माफी मागण्यास सांगितलं आहे. त्याने समय रैनाच्याच कार्यक्रमात आई-वडिलांबाबत अश्लाघ्य वक्तव्ये केली होती. त्यानंतर समाजमाध्यमांवरून त्याच्यावर बरीच टीका झाली होती. त्यानंतर समय रैनाला त्याचा India's Got Latent हा कार्यक्रम बंद करावा लागला होता.

SMA ग्रस्त मुलांच्या पालकांनी समय रैनाविरोधात तक्रार केली होती. हे खूप धाडसी पाऊल असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. तसेच न्यायालयाने म्हटलं आहे की "इन्फ्लुएन्सर्स व कॉमेडियन्सने केवळ सार्वजनिकरित्या माफी मागून चालणार नाही. त्यांनी शपथपत्र द्यावं, ज्याद्वारे त्यांनी स्पष्ट करावं की दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांबद्दल जागरुकता करण्यासाठी ते त्यांच्याकडील समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करतील."

महासागर



# नाशिक जिल्ह्याचे वैभव : ओझरचे 'बाणेश्वर' शिवालय

## शांतिगिरी महाराजांनी ओझरला निर्माण केले देवभूमी जनशांतीधाम

निष्काम कर्मयोगी जगदगुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज धर्मपीठाचे पिठाधिश्वर अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने आणि अथक परिश्रमातून ओझर येथे निर्माण करण्यात आलेले देवभूमी जनशांती धाम येथील "बाणेश्वर" शिवालय नाशिक जिल्ह्याचे वैभव ठरले आहे.या धामात एकूण ११८ शिवलिंगांची स्थापना करण्यात आली आहे.येथे शेकडो देवि-देवतांचेही अधिष्ठान आहे.येथील तब्बल ८१ फूट उंच असलेले हेमाडपंथी बाणेश्वर महादेव मंदिर आकर्षणाचे मुख्य केंद्र आहे.या मंदिराच्या चारही बाजूने पाण्याचे तळे असून येथे ठिकठिकांनी कारंजे बसविण्यात आले आहेत. येथील परिसर निसर्गरम्य असल्यामुळे पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे.







नाशिक जिल्ह्यात मुक्तीधाम, भक्तीधाम नंतर आता ओझर येथील जगदगुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या स्मरणार्थ उत्तराधिकारी अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी शेकडो देवी-देवतांचे अधिष्ठान असलेले देवभूमी "जनशांती धाम" निर्माण केले आहे.या धामाच्या बांधकामासाठी अधिकाधिक लाल पाषाणाचा वापर करण्यात आलेला आहे.जनशांती धामातील प्रमुख आकर्षण बाणेश्वर शिवालय आहे. तब्बल ८१ फूट उंच असलेल्या या नक्षीदार मंदिराची उभारणी हेमाडपंथी पद्धतीने करण्यात आली आहे.एक-एक लाल पाषाण कुशल कारागिरांकडून जागेवर घडवून मंदिराच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेला आहे. येथील अष्टविनायक, अष्टलक्ष्मी, आणि अष्टमूर्ती शंकर या देवतांची मंदिरे देखील हेमाडपंथी पद्धतीनेच बांधण्यात आली आहेत. जगाच्या पाठीवर अजरामर स्मृती म्हणून गणल्या गेलेल्या वास्तू बहुदा लाल पाषाणातच आहेत. लाल किल्ला, कोणार्कचे सूर्य मंदिर, इजिप्त मधील पिरॅमिड , जयपूर शहर , कुतुबमिनार, अलीकडच्या काळातील अक्षरधाम आशा कितीतरी वास्तू आहेत. लाल पाषाणातिल वास्तू शेकडो वर्षे चांगल्या स्थितीत राहू शकतात याचा विचार करून अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी जगदगुरू जनार्दन स्वामी महाराज यांच्या स्मरणार्थ लोककल्याण हेतूने "जनशांती धामा" ची अथक प्रयत्नातून निर्मिती केली आहे. धामाच्या भव्य प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूने गजराज हत्ती विराजमान केले आहे. भव्य प्रवेशद्वार आहे.आत प्रवेश करताच ओम जनार्दनाय नमः हा नाम महामंत्र लिहिलेल्या जप वाह्यांच्या कागदाच्या लगद्यासून बनवलेली जगदगुरु जनार्दन स्वामी महाराजांची नाममूर्ती बसवण्यात आलेली आहे. प्रवेशद्वारावर पंचमुखी पंचमुखी हनुमानाची पंचमुखी श्री गणेशाची मूर्ती स्थापन करण्यात आली आहे.जनशांती धामाच्या आतील प्रवेश द्वारा जवळ शांतीमहागणेश आणि दक्षिणाभिमुख हनुमानजी अशी दोन लाल पाषाणातील आकर्षक मंदिरे आहेत.या मंदिराच्या मध्यस्थाची भव्य नंदीकेश्वराची स्थापना करण्यात आली आहे. श्री बाणेश्वर शिवालया समोर दोन मजली भव्य सभामंडप आहे. पहिल्या मजल्यावर कठोर तपस्वी निष्काम कर्मयोगी जगदगुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांचे प्रमुख मंदिर आहे.याच मंदिराच्या गाभाऱ्यात महाराष्ट्रातील विविध थोर संतांचा मेळा आहे.त्यात जगदगुरू शंकराचार्य, संत निवृत्तीनाथ महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत सावता महाराज, संत गोरोबाकाका महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत नरहरी महाराज, संत तुकाराम महाराज, भक्त परिवाराचे आद्यगुरू श्री नागाबाबा आदी दिव्य संतांच्या मूर्तींचे अधिष्ठान आहे.याच मंदिराच्या मागच्या बाजूला अष्टमूर्ती शंकर , अष्टविनायक, अष्टलक्ष्मी आदी देवतांची मंदिरे आहेत.कुबेर देवता, अन्नपूर्णा माता, आदी विविध श्री मूर्तींची स्थापना करण्यात आलेली आहे.मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर राधाकृष्ण, विठ्ठल-रुक्मिणी, श्रीराम दरबार, लक्ष्मी-नारायण, श्री दत्तात्रेय भगवान, जगदमाऊली म्हाळसामाता, जगद माऊली फुला माता (प्रतिमा), शिवभक्त अहिल्याबाई, नवग्रह देवता, कासव देवता व यानंतर भव्य बाणेश्वर शिवालय आहे. त्यात समोर माता पार्वतीची मूर्ती आहे.दुसऱ्या बाजूने बालगणेश, कार्तिक स्वामींसह संपूर्ण शिव परिवाराची अत्यंत आकर्षक मूर्ती आहे. बाणेश्वर शिवालयाच्या ८१ फुटावरील सर्वात वरच्या टप्प्यात "स्वर्ग शिवालय" निर्माण करण्यात आले आहे. या मंदिरात जाण्याचा मार्ग मात्र खडतर आहे. मंदिराला लावण्यात आलेल्या साखळदंडाला धरून केवळ साधना काळात या मंदिरात जाता येते. मंदिर परिसरात स्कंध, किर्तीमुख, सप्तर्षी, वीरभद्र, कुबेर, दीशा देवता, इंद्र, यमराज, वायू देवता, अग्नी देवता, वरुण देवता, गरुड, सोम, विशाल धर्मध्वज यांसह शेकडो देवी-देवतांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आलेली आहे. मंदिराच्या दोन्ही बाजूला १०८ शिवलिंगाची आणि १०८ गोमुखांची स्थापना करण्यात आलेली आहे.येथे नर्मदा मातेच्या मूर्तीसह नर्मदा नदीचे उगमस्थान निर्माण करण्यात आले आहे.चार धाम, साडेतीन शक्तीपीठ, बारा ज्योतीर्लिंगांच्या मंदिरे लाल पाषाणात आहेत. जनशांती धामाच्या अवती-भवती पाण्याचे तळे निर्माण करण्यात आले आहे.आश्रम परिसरात वसतिगृह तसेच कार्यक्रमांसाठी दोन हॉल, तीन मजली दोन भव्य इमारत आणि सर्व सुविधायुक्त गोशाळा देखील आहे.पर्यटनाच्या दृष्टीने भव्य गार्डन सह पार्किंग सह विविध सुविधा येथे उपलब्ध आहेत. नाशिक जिल्ह्यांतील विविध शाळेंच्या सहली येथे प्रतिवर्षी येत असतात. ओझर येथील हा आश्रम मुंबई-आग्रा हायवे फ्रंट असल्याने हायवेने येणारे-जाणारे वाहनधारक - यात्रेकरूंचे पावले ओघानेच या आकर्षक आश्रमाकडे वळतात. येथे अध्यात्मिक आणि निसर्गरम्य वातावरण असल्याने यात्रेकरू देवतांच्या दर्शना बरोबरच वनभोजनासाठी येथे आवर्जून थांबतात.आश्रमाच्या वतीने देखील येथे भांडारगृह उभारण्यात आले असून येथे भाविकांना दूध प्रसाद व नाश्त्यासह भोजनाची विनामूल्य व्यवस्था करण्यात आलेली आहे.भाविकांसाठी भक्त निवास, संतांसाठी संत निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.मंदिरास भेट देणाऱ्या विशेष अतिथींसाठी सुविधायुक्त अतिथी कक्ष बनविण्यात आलेला आहे. या संस्थांनचे संस्थापकीय अध्यक्ष तथा या धर्मपीठाचे पिठाधिश्वर अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत आश्रमात वर्षभर विविध धर्मसोहळे पार पडतात. प्रामुख्याने परमपूज्य बाबाजींच्या मातोश्री जगदमाऊली म्हाळसामाता व मातोश्री फुला माता यांच्या पुण्यतिथी निमित्त वार्षिक महिला जपानुष्ठान सोहळा प्रतिवर्षी हजारो महिलांच्या उपस्थितीत येथे मोठ्या उत्साहात संपन्न होतो. तद्वतच श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारच्या महाअभिषेक-पूजा बरोबरच "चौथ्या श्रावणी सोमवारी" विशेष धर्मसोहळा पार पाडतो.महाराष्ट्रभरातील विविध जिल्ह्यातून आलेल्या हजारो भविकांच्या उपस्थितीत लक्षवेधी कावड यात्रा, शिवमहाजलाभिषेक सोहळा यावेळी लक्षवेधी स्वरूपात संपन्न होते.महाशिवरात्रीच्या महापर्वकलावर देखील विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. वर्षभर लहान-मोठ्या विविध सोहळ्यासह प्रत्येक महिन्यात पौर्णिमा उत्सवही जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न होतो. समाजातील प्रत्येक घटकाला चार धाम, बारा ज्योतीर्लिंग, साडेतीन शक्तीपीठ, अष्टविनायक दर्शन यांसह विविध देवी-देवतांचे दर्शन होऊन त्यांचे अध्यात्मिक विचार प्रबळ व्हावे आणि भक्त परिवाराच्या परंपरेनुसार श्रमदानातून त्यांना पुण्यप्राप्ती व्हावी याच हेतूने या विविध मंदिरांची उभारणी करण्यात आली आहे. येथे स्थापन करण्यात आलेल्या देवतांची पहाटे ४ वाजता, सकाळी ११ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता नित्यनियम विधिसह त्रिकाल पूजा-आरती करण्यात येते.येथील पूजा व्यवस्थेकडे स्वतः अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचे बारकाईने लक्ष असते. त्यामुळेच देवभूमी जनशांती धामातील विविध देवतांची जागृतता दिवसागणिक वाढतच आहे. एकूणच अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांनी निर्माण केलेले देवभूमी जनशांती धाम नाशिक जिल्ह्याचे वैभव ठरलेले असून भविकांसाठी मानसिक, अध्यात्मिक आश्रयाचे तीर्थक्षेत्र बनले आले.

**- अमर तानाजीराव आढाव, ओझर (मिग)**

# नाशिक जिल्हा महानुभाव समितीतर्फे श्री चक्रधर स्वामी अवतारदिन महोत्सव, सत्कार सोहळा

**नाशिक ।** अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या अंतर्गत नाशिक जिल्हा महानुभाव समिती यांच्यावतीने महानुभाव पंथाचे संस्थापक व मराठी भाषेचे आद्य प्रणेते भगवान श्री चक्रस्वामी अवतार दिन तथा जयंती महोत्सव व सत्कार सोहळ्याचे दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजन करण्यात आले आहे.

दि. २५ ते २८ ऑगस्ट दरम्यान या निमित्त विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या अंतर्गत नाशिक जिल्हा महानुभाव समितीच्या वतीने गेल्या ५६ वर्षापासून अखंडपणे भगवान श्री चक्रस्वामी अवतार दिन तथा जयंती उत्सव साजरा केला जातो. जयंती उत्सवाचे यंदाचे ५७ वर्ष आहे. यानिमित्त अवतार दिन महोत्सव आयोजक समितीच्या वतीने श्री दत्त मंदिर मोजे सुकेणे येथे सोमवार , दि. २५ रोजी ६ वाजता पहाटे देवास मंगलस्नान,



ऊटी, विडा अवसर , गितापाठ होणार आहे. ९ वाजता ध्वजारोहण होणार असून, जयंती सोहळ्यानिमित्त अ. भा. महानुभाव परिषदेचे उपाध्यक्ष महंत सुकेणकर बाबा यांच्या हस्ते यांच्या सुखदानीबाबास विडा अवसर, पूजन, आरती, उपहार उपस्थितीत होणार आहे . तर मंगळवार दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ११ वा. श्री चौरंगी विद्या स्थान , कोणार्कनगर येथे प. पू. अंकुळणेरकर बाबा यांचे कथा निरूपण स्थान होणार आहे . बुधवार दि. २७ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता आडगाव येथील श्री चक्रस्वामी मंदिर ते श्रीपंचकृष्ण लॉन्स , कोणार्कनगर पर्यंत श्री मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी श्रीचक्रधर गोप मंडळ, खेरवाडी तसेच संत महंत व सदभक्त यामध्ये सहभागी होणार आहेत. त्यानंतर रात्री आठ वाजता प .पू. मंहत प्रभाकर बाबा कपाटे (भोकर नांदेड ) यांचे जाहीर कीर्तन होणार आहे . यावेळी साथ संगत जिव्हाळे ,आडगाव व ब्राह्मणवाडे येथील भजनी मंडळ करणार आहेत.

मुख्य अवतार दिन जयंतीचा मुख्य कार्यक्रम धर्मसभा व सत्कार सोहळा गुरुवार दि. २८ ऑगस्ट रोजी होणार असून पहाटे ६ वाजता देवास मंगल स्नान , श्रीमद्भगवद्गीता पाठपारायण , सकाळी ९ वाजता ध्वजारोहण , त्यानंतर सभा मंडप उद्घाटन , महंत परमपूज्य आत्याबाईची (छत्रपती संभाजी नगर ) यांच्या हस्ते होणार असून सकाळी ९.३० वाजता धर्मसभा, व्याख्यान सत्र व सत्कार सोहळा होणार असून सभेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष कवीश्वर कुलाचार्य महंत कारंजेकर बाबा उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी दीप प्रजनन होईल, व्याख्यान सत्रात महंत मुधोव्यास बाबा शास्त्री ( वरोरा, चंद्रपूर ) , भागवताचार्य महंत चिरडे बाबा (निफाड) , महंत तळेगावकर बाबा शास्त्री (साळवाडी , पुणे ) यांच्या व्याख्यान होणार आहे. त्याचप्रमाणे प्रकाशन सोहळा व माजी आमदार बाळासाहेब यांच्या हस्ते आहे संत , महंतांचा सत्कार सोहळा होणार आहे. त्यानंतर १२ व वाजता विडा अवसर ,महापूजा, आरती व उपहार अधिक कार्यक्रम होणार आहेत. याप्रसंगी विशेष उपस्थिती मंहत कापूसतळणीकर बाबा (फलटण) आणि मंहत कृष्णराज बाबा पंजाबी ( शिक्रापूर ) हे उपस्थित राहणार आहेत.

# नाशिकला 'हृदय सुरक्षित शहर' करू या : डॉ. विनोद विजन



**नाशिक ।** जगभरात मृत्युचे प्रमुख कारण असलेल्या हृदयविकाराच्या गंभीरतेवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे असून विशेषतः भारतीयांमध्ये हा विकार पाश्चात्त्य देशांपेक्षा एक किंवा दोन दशके आधी दिसून येतो. अचानक हृदयविकाराचा झटका हे एक अत्यंत गंभीर रूप आहे. जर तत्काळ उपचार मिळाले नाहीत, तर चौथ्या मिनिटापासून अपरिवर्तनीय मेंदूचे नुकसान सुरू होते आणि दहा मिनिटांत मृत्यू होऊ शकतो. अशा वेळी डॉक्टर किंवा पॅरामेडिकल जवळ नसतात, त्यामुळे नागरिकांनी हे सोपे आणि तीस मिनिटांत शिकता येणारे जीवनरक्षक तंत्र शिकणे अत्यंत गरजेचे असल्याची माहिती विजन हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरचे हृदय विकार तज्ज्ञ डॉ. विक्रांत विजन यांनी दिली.

एका कार्यशाळेच्या कार्यक्रमात ते बोलत होते.अरीज या नामांकित सॉफ्टवेअर कंपनीचे सुमारे १२० कर्मचारी आणि अधिकारी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. त्यांनी सीपीआर आणि एईडीच्या वापराबद्दल जीवन वाचवणारे तंत्र शिकले. विजन हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरचे अंतिम उद्दिष्ट, नाशिकला "हृदय सुरक्षित शहर" बनवणे आहे.


यासाठी सुरुवातीला ५० एईडी बसवले जातील आणि नंतर ही संख्या शंभर पर्यंत वाढवली जाईल. त्यांचा पाचवा एईडी त्र्यंबकेश्वर मंदिरात बसवण्याची योजना आहे. व्हीयूएचएफने अरीज फाऊंडेशनने त्यांच्या सहकार्याबद्दल आभार मानले आणि या महत्त्वपूर्ण कार्यासाठी सार्वजनिक आणि परोपकारी व्यक्तींना योगदान देण्याचे आवाहन केले.

## ➤ महत्त्वाचे

### तिडके कॉलनीसह परिसरात पंधरा दिवसापासून गढूळ पाणी

**नाशिक ।** गेल्या पंधरा दिवसापासून शहराच्या मध्यवर्ती असलेल्या प्रभाग क्रमांक १२ मधील तिडके कॉलनी परिसरात गढूळ पाणीपुरवठा





होत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तिडके कॉलनीसह राहुल नगर, मिलिंद नगर, चांडक सर्कल परिसरात गडूळ पाणी येत आहे. नागरिकांनी मनपाकडे तक्रार देऊनही उपयोग झालेला नाही. जवळपास 30 हजारांहून नागरिकांना नळाद्वारे गढूळ पाणी मिळत आहे. पावसाळ्यात त्यामुळे आजार उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. महापालिकेला तक्रार करून देखील कोणी दखल घेतली नाही. नळास पुरेसा व नियमित पाणीपुरवठा होत असला तरीपण गढूळ पाणी येत असल्यामुळे नागरिकांना पाणी विकत घेण्याची वेळ आलेली आहे. महापालिकेने त्वरित लक्ष देऊन गढुळ येणारे पाणी बंद करावे व नागरिकांना स्वच्छ पाणी पुरवावे, अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे.

# सुविचार मंच, विद्यार्थी कृती समितीचा स्तुत्य उपक्रम

## 'देव द्या, देवपण घ्या'तून मूर्ती संकलन

**नाशिक ।**'प्लॅस्टर ऑफ पॅरिस'च्या मूर्तीवर केलेले रासायनिक रंगकाम व इतर सौंदर्य प्रसाधनामुळे गोदावरी नदी व इतर जलाशयांचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. हे प्रदूषण थांबविण्यासाठी नाशिककरांनी मातीच्या गणेश मूर्तींना प्राधान्य द्यावे, असे आवाहन "देव द्या, देवपण घ्या !" या उपक्रमाचे संयोजक आकाश पगार यांनी केले आहे.

सुविचार मंच व विद्यार्थी कृती समिती या संस्थेंच्या माध्यमातून गेल्या १४ वर्षांपासून "देव द्या, देवपण घ्या !" हा उपक्रम राबविण्यात येतो. यंदाचे या उपक्रमाचे पंधरावे वर्ष आहे. दरवर्षी नाशिककरांकडून संकलित केलेल्या लाखो गणेश मूर्ती नाशिक महापालिकेकडे सुपूर्द करण्यात येतात.'प्लॅस्टर ऑफ पॅरिस' हे अनेक महिने पाण्यात विरघळत नाही. त्यामुळे प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा गाळ नदी व अन्य जलाशयाच्या तळाशी साचतो त्या मुळे नदीतील पाण्याचे जिवंत झरे बंद होण्याची शक्यता असते. प्लॅस्टर ऑफ परिसच्या मूर्तीवरील रासायनिक रंगामुळे मासे व इतर जलचरांना धोका निर्माण होतो तसेच पाण्याच्या गुणवत्तेला देखील हानी पोहचते. त्यामुळे गणेशोत्सवात गणपतीच्या



पुजेसाठी व पर्यावरणासाठी उपयुक्त अशा मातीच्या मूर्तींना नाशिककरांनी प्राधान्य द्यावे, असे आवाहन 'देव द्या, देवपण घ्या !' पगार यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात केले आहे.

गणेशोत्सवातील १० दिवस सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे व घरोघरी जाऊन विद्यार्थी कृती समितीच्या कार्यकर्त्यांकडून पीओपीच्या गणेशमूर्ती नदीपात्रात विसर्जित न करता दान करावे अशी जनजागृती करणारी पत्रके वाटली जातात. नाशिकचे गोदाप्रेमी भाविक या आवाहनाला दरवर्षी भरभरून पाठिंबा देत आहेत. गेली १४ वर्षे सातत्याने हा उपक्रम राबविला जात असल्याने दीड, पाच व सात दिवसांच्या गणेशोत्सवातील मूर्ती देखील स्वीकारण्यात येतात. दरवर्षा प्रमाणे यंदा देखील अनंत चतुर्दशीच्या दिवशी चोपडा लॉन्स जवळील गोदापार्क येथे सकाळी ९ ते २ या वेळेत "देव द्या, देवपण घ्या" उपक्रमाचे कार्यकर्ते मूर्ती स्वीकारण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश पगार, विशाल गांगुर्डे, सागर बाविस्कर, वैष्णवी जोशी, राहुल मकवाना, जयंत सोनवणे, जयश्री नंदवानी, तुषार गायकवाड, गौरी घाटोळ, कुणाल सानप, भाग्यश्री जाधव, सोनू जाधव, दुर्गा गुप्ता, ललित पिंगळे, योगेश निमसे, प्रणाली शिंदे, मदन म्हैसधुणे, संकेत निमसे, सुजित सोनवणे, दिपाली जाधव, स्मिता शिंदे, प्रसाद हिरे, अविनाश बरबडे, सागर दरेकर, संदिप उफाडे, स्नेहा आहेर, सिद्धार्थ दराडे, महेश मंडाले, वैभव बारहाते, आकाश खरे, अक्षय नेर, अमोल भांड, राहुल घोडे, रोहित कळमकर, शुभम पगार, जीत मोरे, विकास ओढेकर, अश्विन बोडके, राहुल पवार, हरी चौधरी, युवराज कुरकुरे, दिगंबर काकड, मंगेश जाधव, गीतांजली पवार, श्रेया सोनवणे, सानिया पगार, भावेश पवार, योगेश माळोदे, किशोर वाघ, रोहित जाधव आदी परिश्रम घेत आहेत.

# वैद्यकीय क्षेत्र संशयाच्या फेऱ्यात?

**अशोक थोरात यांजकडून**

**लखमापूर ।** जीव वाचवणारे म्हणजे जीवदान देणारे क्षेत्र म्हणजे वैद्यकीय क्षेत्र. पण अलिकडे जीव घेणारे व लुट करणारे क्षेत्र म्हणजे वैद्यकीय क्षेत्रच होय. यात पण काही अपवाद समाजात असुन समाजाच्या स्वास्थ्या साठी सतत धावाधाव करीत असतात.

किरकोळ आजाराच्या नावाने पेशंट भरती करून सलाईन नावाच्या दोरखंडाला बांधायचे व चोवीस तास सलाईन देत उपचार करायचे. अधुन मधुन पेशंटच्या नातेवाईकांना घाबरवायचे हळुच दिलासा द्यायचा व दररोजचा खर्च वाढवायचा त्यात आवश्यक व अनावश्यक हे फक्त डॉक्टरांनाच माहीत. पेशंट जगत नाही हे समजल्यावर व्हेंटीलेटर लावायचे व पैसा छापतच रहायचा, मग पोट भरल्यावर पेशंट प्रतीसाद देत नाही, घरी न्यायचा सल्ला द्यायचा तो पर्यंत बरेच लाख ओरबडले जातात. कधी कधी सरकारी दवाखान्यातील अस्वच्छता, पेशंटकडे होणारे दुर्लक्ष, उर्मट भाषा बघुन कळत असुनही महागड्या हॉस्पिटलचा आधार घ्यावा लागतो. बोगस डॉक्टरांच्या नावाने बोंबाबोंब सुरू असते. पण ग्रामीण भागात हे बोगसच किंवा काही चांगले डॉक्टरच जनतेला दिलासा देतात. पण कधी कधी पेशंटवर



कुवत नसतांना मोठे उपचार करतांना पेशंट वाईट अवस्थेत गेल्यावर शहरात पाठवतात व तेथे पण अपयश येते. अनेक कंपाऊंडर छाती काढुन दवाखाने थाटुन बसले आहेत. तर काही पुरावा नको म्हणुन फक्त बॅग घेऊन फिरतात व सलाईनचा अनावश्यक मारा करून पेशंटच्या जिवाशी खेळतात व जिव घेतात. ही व्यवस्था बदलणे अवघड वाटते. कारण बोकाळलेले आर्थीक घोटाळे व त्यात सर्वच सामील, मग दुरूस्तीची अपेक्षाच न केलेली बरी. सरकारी योजनेचा पैसा, वरून नातेवाईकांकडुन काढलेला पैसा, मेडीक्लेमचा वसुल होणारा पैसा यात तर जबरदस्त लुटा लुट सुरू आहे. घाई न करता शांतपणे माहीती काढुनच डॉक्टर शोधावे हाच पर्याय आहे. अधुन मधुन काही डॉक्टर मार खातात. हॉस्पिटलची तोडफोड होते. त्याचे समर्थन करता येत नसले तरी आत्मपरीक्षण केल्यास सर्वांचे उत्तर सापडते. सेवा देणार्‍यांनी मेवा मेवा न करता सेवा द्यावी. अलिकडे तर मेडीकल हा तर दरोडेखोरीचा प्रकार आहे. मेडीसीनच्या हजारो कंपन्या. एम.आर.पी. म्हणजे मनमानीच. यावर कुणाचेच बंधन नाही. म्हणजे जगायचे तर लुटु द्या व मेलात तरी भिकारी होऊन मरा.

## महत्त्वाचे

### पावसाच्या विश्रांतीने गणेशभक्तांना दिलासा

**नाशिक ।** पावसाने शुक्रवारी पुर्ण विश्रांती घेत्ल्याने गेल्या काही दिवसांपासून सार्वजनिक गणेशोत्सवाच्या तयारीला लागलेल्या गणेश भक्तांना मोठा दिलासा मिळाला असून, मंडपाची उभारणी, सजावट व देखाव्यांच्या कामांनी वेग घेतला आहे. गेल्या वर्षी देखील पावसाने गणेशोत्सवाच्या तयारीत खोडा घातला होता. यंदा मात्र गेल्या पंधरा दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे मंडळांनी तयारीला सुरूवात केली होती. मंडपाची उभारणी करण्याबरोबरच पावसापासून बचावासाठी उपाययोजना केली जात आहे. अनेक मंडपांच्या ठिकाणी पावसाचे पाणी साचले तर काही ठिकाणी चिखलाचे साम्राज्य झाल्यामुळे गणेशभक्तांना अडचणीचा सामना करावा लागला.आता मोठे देखावे उभारण्यास सुरूवात केली असून, शेकडो कारागिर या कामात गुंतले आहेत. त्यासाठी गेल्या पंधरा दिवसांपासून दिवस-रात्र कामे केली जात आहे. शुक्रवारी बाजारपेठेत गणेशोत्सवाच्या खरेदीची लगबग दिसून आली. मेनरोड, हुंडीवाला लेन, सराफ बाजार, शालीमार, शिवाजीरोड, रविवार कारंजा या भागात देखाव्यांच्या साहित्यांनी बाजारपेठ गजबजली आहे. शिवाय जागोजागी गणेशमुर्ती विक्रीचे स्टॉल लागले आहेत. सायंकाळनंतर घरगुती गणेशमुर्ती बुक करण्यासाठी बाजारात गर्दी दिसून आली.

### गजानन महाराज संजीवन समाधी दिनानिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार

**नाशिक ।** शहरातील श्री.गजानन महाराज सेवा संस्थेच्या वतीने श्रींगजानन महाराजांचा ११५वा संजीवन समाधीदिन गुरुवार, दि.२८ ऑगस्ट २०२५ रोजी श्रींअवधूत स्वामी मठ, हेमलता टॉकीज जवळ, रविवार पेठ, नाशिक येथे साजरा होत आहे. स.८ वा श्रींच्या रजत मुखवट्यास रुद्राभिषेक-पूजन-आरती ह.भ.प. दामोदर गावले महाराज यांचे स. ९.३० वा कीर्तन होईल. आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ स. ११ वा. व दु.२ वाजेपर्यंत महाप्रसाद वाटप करण्यात येईल. आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ मानकरी सहाय्यक प्राध्यापक - केटीएचएम कॉलेजच्या सौ.कीर्ती बामणोदकर, व्हीएन नाईक कॉलेजच्या डॉ.रूपाली सानप. मुख्याध्यापक संवर्गातून- श्रीम. सुनंदा ठाकरे मराठा हायस्कूल, सारडा कन्या विद्यालय सौ.नंदिनी कहांडळ, पेठे विद्यालय गंगाधर बदादे, कोठारी कन्या सुनिता कासार, बालमुक्तांगण अनुराधा जोशी, पुरुषोत्तम हायस्कूल सुगंधा सोनवणे, गोपाळ विद्यालय पिंपळे ता.सिन्नर लक्ष्मण बेनके, सरस्वती विद्यालय देवयानी भदाणे. माध्यमिक शिक्षक - श्री.नितीन धायगुडे माध्य. विद्यालय उंटवाडी, नर्गिसदत्त विद्यालय मनीषा साळुंके, डीडीबिटको बॉईज लतिका गरुड, वायडी बिटको गर्ल्स हाय. कैलास बागुल, सारडा कन्या विद्यालय शामल पाटील, सॅक्रेडहार्ट स्कूल अर्चना सोनवणे, पेठे विद्यालय श्री.प्रवेश नरसकर, र.ज.बिटको हाय. मृणाली कुलकर्णी. प्राथमिक शिक्षक- सागरमल मोदी विद्यालयाच्या श्रीम.सुरेखा घुले, श्रीम. क्रांती बोराटे, श्रीम. मंगला बनकर, अनघा कुलकर्णी, जिल्हा परिषद हरसुल शाळा कृष्णा राऊत, जि.प.बलाईदूरी,ता. इगतपुरी सुनंदा अहिरे, जि.प. पिठुंदी,ता.पेठ देविदास भांगरे, प्राथमिक विद्यालय उंटवाडी नेहा बोडखे, मनपा शाळा क्र.१ म्हसरूळ शुभांगी कापडणीस. कोठारी मुलींची शाळा श्रीम.सुनिता सोनगिरे यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

### दिग्विजय (सनी) अहिरराव यांचे निधन

**पिंपळनेर ।** येथील सुभाष चौकातील रहिवाशी व पुणे येथील बजाज ऑटो लिमिटेड मध्ये अग्निशामक अधिकारी म्हणून कार्यरत असलेले दिग्विजय (सनी) अहिरराव (वय ३४) यांचे शनिवारी सकाळी ११.३० च्या सुमारास दुर्दैवी निधन झाले. त्यांच्यावर रविवारी सकाळी १०.३० वाजता पिंपळनेर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, आजी, आई, १ भाऊ,१ बहीण असा परिवार आहे.



### ठकूबाई एरंडे यांचे निधन

**सिन्नर ।** गुरेवाडी (ता. सिन्नर) येथील ठकूबाई लक्ष्मण एरंडे (वय ८९) यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. 'मविप्र'तील सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. सोपान एरंडे व सुधाकर एरंडे यांच्या त्या मातोश्री होत.



### गजानन बोडके यांचे निधन

**सिन्नर ।** येथील गजानन सहादराव बोडके (वय ५५) यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी लता, मुली स्वाती, प्रीती, मुलगा वैभव, नातू असा परिवार आहे. राजेंद्र महाजन यांचे ते मेहुणे होत.



# आदिवासी बांधवांचा भर पावसात मोर्चा




**नाशिक ।** आदिवासी संघटनांकडून आपल्या विविध मागण्यांसाठी तपोवन येथून विभागीय आदिवासी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोर्चामुळे पंचवटी परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. मोर्च्या दरम्यान वेळोवेळी पाऊस पडला तरी मोर्चेकरी कुठेच थांबले नाही.

आदिवासी बांधवानी आणि संघटनांनी मिळून सोमवार (दि. २५) विभागीय आदिवासी आयुक्त कार्यालयावर मोर्चाचे आयोजन केले होते. आदिवासी विकास विभाग अंतर्गत शासकीय आश्रम शाळेतील शिक्षकांची १ हजार ७९१ पदे बाहासोत (कंत्राटी / खाजगीकरण) द्वारे भरण्याचा शासन आदेश दि. २१ मे २०२५ तात्काळ रद्द करण्यात यावा. रोजंदारी वर्ग ४ कर्मचा-यांचे मृत संवर्गातील पदे तात्काळ जीवित्त करण्याचा १६ नोव्हेंबर २०२२ चा सुधारित आकृतीबंध रद्द करण्यात यावा. आदिवासी शासकीय आश्रमशाळा व वसतिगृह मधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ कार्यरत वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी यांना तात्काळ रोजंदारी / तासिका मानधन तत्वावर शाळेच्या पहिल्या दिवसापासून हजर करावे.. शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व भौतिक सुविधा तात्काळ उपलब्ध करणे, रखडलेली १७ संवर्ग पेसा अंतर्गत पदभरती सुरु करणे. सेंट्रल किचन योजना रह करून पूर्वीप्रमाणे आश्रम शाळेत भोजन व्यवस्था सुरु करणे. वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी करणे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार अधिसंख्य पदांची तात्काळ भरती करणे व बोगस कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त करून मूळ आदिवासींची भरती करणे. शबरी आवास योजना निधी तात्काळ वितरित करणे. ५ वी अनुसूची सर्व हक्क व अधिकार लागू करणे, UCC (यूनिफॉर्म सिविल कोड) समान नागरी कायदा रद्द करणे, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत (NHM) नियमित सेवेत समायोजनबाबत शासन निर्णय दि. १४ मार्च २०२४ ची अमलबजावणी करावी. जन सुरक्षा कायदा रद्द करणे. आशा सेविका व अंगणवाडी सेविका यांना शासनात विलीन करावे. वनपट्टे धारकांना मिळालेल्या जमिनींचा स्वतंत्र ७/१२ द्यावा. या मागण्यांसाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चामध्ये लकी जाधव, भास्कर गावित, अशोक बागुल (आदिवासी बचाव अभियान), विकी मुंजे, प्रभाकर फसाळे, राजेंद्र वाघले, सुरेश खेताडे, पृथ्वीराज अंडे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# भ्रष्टाचाराला चाप; जिल्हा परिषदेत पारदर्शक पदोन्नतीची अंमलबजावणी



**यांची झाली पदोन्नती...**

- बाबुराव पालवी यांची आरोग्य विभाग
- रत्नाकर शिर्के पंचायत समिती दिंडोरी
- ललित घारे इवद क्रमांक ३
- प्रथमेश गायकवाड महिला व बालकल्याण विभाग जि प नाशिक
- चंद्रशेखर वैष्णव मालेगाव पंचायत समिती
- बाळू फावडे नांदगाव पंचायत समिती येथे कनिष्ठ प्रशासन अधिकारी

## पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांचे सीईओंकडून अभिनंदन

**इम्पॅक्ट**

**नाशिक ।** जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती प्रक्रियेला भ्रष्टाचाराचे गालबोट लागल्याच्या आरोपानंतर अखेर काल पारदर्शकतेने पदोन्नत्या पार पडल्या. सहा कर्मचाऱ्यांना नियमानुसार पदोन्नती देण्यात आली असून एका कर्मचाऱ्याने पदोन्नती नाकारली आहे. या प्रक्रियेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांनी पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यापूर्वी दैनिक महासागरने जिल्हा परिषदेतील पदोन्नती प्रक्रियेत सौदेबाजी झाल्याचे वृत्त प्रसिद्ध करताच जिल्हा परिषदेत खळबळ उडाली होती. या गंभीर वृत्ताची दखल घेत सीईओ पवार यांनी तात्काळ पदोन्नती प्रक्रिया थांबवत सामान्य प्रशासन विभागाला धारेवर धरले होते. तसेच पदोन्नती केवळ सेवा जेष्ठतेनुसार आणि नियमांचे काटेकोर पालन करून करावी, असे स्पष्ट आदेश दिले होते. या कारवाईनंतर पाचव्या क्रमांकावर असलेल्या रत्नकर कारभारी शिर्के यांनी आपल्या जेष्ठतेचा आक्षेप नोंदवला होता. जरी त्यांनी नंतर आपला आक्षेप मागे घेतला असला तरी, पदोन्नती प्रक्रियेत फेरफार व सौदेबाजीच्या चर्चेला उधाण आले. अखेर सीईओंच्या हस्तक्षेपामुळे प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण झाली. पवार यांच्या कठोर भूमिकेमुळे जिल्हा परिषदेतील भ्रष्टाचाराला आळा बसेल, असा विश्वास कर्मचारी संघटनांनी व्यक्त केला आहे. पदोन्नती प्रक्रियेत झालेल्या या अर्थपूर्ण घडामोडीमुळे जिल्हा परिषदेतील पारदर्शक प्रशासनाला बळ मिळाले असून, प्रामाणिक कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

### सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी फी माफ

**नाशिक ।** नाशिक मनपा हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी घेण्यासाठी आकारण्यात येणारी फी माफ करण्याचा निर्णय नाशिक मनपाच्या आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना दिलासा मिळणार आहे. नाशिक मनपा दरवर्षीप्रमाणे यंदाही सार्वजनिक गणेशोत्सव शांतता, सुरक्षितता व पर्यावरणपूरक रीतीने पार पडावा यासाठी आवश्यक ती सर्व तयारी मनपा करत आहे. नागरिकांनीही पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

## बनावट बहिणींची माहिती दडविण्याचा प्रयत्न

**नाशिक ।** जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनीही लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याची माहिती सरकारी पातळीवर पोहचली आणि ग्रामविकास विभागाने थेट संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत पत्र काढले असले तरी जिल्हा महिला व बालविकास विभाग मात्र यापासून अनभिज्ञ असल्याचे भासविले जात आहे. किती कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला, यासंदर्भातील माहितीच या विभागाकडून जाहिर केली जात नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे. महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहिण योजना आणली. परंतू गेमचेंजर ठरलेल्या या योजनेचा गैरफायदा बनावट बहिनींनी घेतल्याचे समोर येत आहे. एवढेच नाही तर, जिल्हा परिषदेच्या १,१८३ कर्मचाऱ्यांनीही योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर ग्रामविकास विभागाने कडक पावले उचलली. संबंधित महिला कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.




दुसरीकडे स्थानिक पातळीवर मात्र महिला व बालविकास विभाग अद्यापही अनभिज्ज्ञ असल्याचे आढळून आले. जिल्हा परिषदेच्या ज्या काही महिलांनी लाभ घेतला, तो आकडा राज्यभरातील आहे. यात नाशिक जिल्हा परिषदेच्या किती महिला कर्मचारी आहेत, याची माहितीच या विभागाकडे उपलब्ध नाही. बनावट लाभार्थ्यांची आकडेवारी सरकारीपातळीवरून जाहिर होऊ शकते, म्हणजे ही माहिती स्थानिक पातळीवरूनच पोहचविण्यात आल्याचे स्पष्ट होते. तरीही महिला व बालविकास विभाग माहितीची दडवादडवी करीत असल्याने संशयाचे धुके दाटले आहे.

# दानपेटीच्या ताब्यावरून वादंग; पोलीस ठाण्यात तक्रार

## श्री कपालेश्वर महादेव देवस्थान वाद

**नाशिक ।** शहरातील प्रसिद्ध व लाखो शिवभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या कपालेश्वर महादेव मंदिरातील नवा बाद आता समोर आला आहे दानपेटीच्या ताब्यावरून दोन गटात तुंबळ हाणामारी झाली सदर घटना देवस्थानच्या सीसीटीव्ही तही कैद असून समाज माध्यमावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे शिवभक्तात नाराजीचा सूर उमटला आहे दरम्यान दोन्ही बाजूंकडून पंचवटी पोलीस ठाण्यात परस्परांविरुद्ध तक्रार दाखल झाली आहे.

श्री कपालेश्वर महादेव देवस्थानच्या मागे लागलेले शुक्लकाष्ठ संपण्याची चिन्हे नाहीत मागील वर्षीपासून सुरू असलेला विश्वस्त गुरव वा द विश्वस्त मंडळाच्या बरखास्ततीनंतर आलेली प्रशासकीय राजवट व त्यानंतर आता गुरव परिवारातील चार्ज देण्यावरून झालेल्या आपसातील वादामुळे देवस्थान पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. याबाबत पंचवटी पोलीस ठाण्यात परस्परांविरुद्ध तक्रार दाखल झाली आहे श्री कपालेश्वर महादेव मंदिरावर कार्यरत विश्वस्त मंडळ उच्च न्यायालयातील सुनावणीनंतर बरखास्त करून धर्मदाय आयुक्त कार्यालयातील विलास पाटील यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली त्यानंतर हा वाद मिटल्याची चिन्हे असतानाच रविवारी तारीख 24 सकाळी हेमंत (पप्पू) गाडे व अनिल भगवान गाडे यांच्यात मंदिरातील चार्ज देण्यावरून वाद उफाळला यावेळी दोन्ही परिवारात जोरदार वादावादी झाल्याचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाल्यावर त्याची चर्चा सुरू झाली.

> गुरव परिवारातील वादाशी कपालेश्वर महादेव संस्थांचा कोणताही संबंध नाही हा व्यक्तिगत वाद असल्याने त्याचा संबंध देवस्थानशी जोडू नये.
>
> **- विलास पाटील, प्रशासक, श्री कपालेश्वर संस्थान**

**समोपचाराने वाद मिटवण्याचा प्रयत्न**

हा वाद पंचवटी पोलीस ठाण्यात पोहोचल्यावर पोलिसांकडे हेमंत गाडे व अनिल गाडे यांनी परस्परांविरुद्ध तक्रार दाखल केली मंदिरातील अधिकार व दानपेटीवरून यापूर्वीही वाद झाले होते दरम्यान हा वाद सामोप्रचाराने मिटवण्याचा प्रयत्न सुरू आहे मात्र सततच्या वादावादी मुळे हे देवस्थान भाविकांच्या चर्चेत आले दरम्यान वर्षानुवर्षे येथील दानपेटी वरून सुरू असलेला वाद मिटण्याची चिन्हे नसल्याने पोलीस व मंदिर प्रशासन कोणती भूमिका घेतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# नाशिक नगरीत बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू; बाजारपेठेत नागरिकांची उत्साही खरेदी





**नाशिक ।** गणेशोत्सवा साठी नाशिक नगरी बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठा, गल्लीबोळ आणि मुख्य रस्त्यांवर सध्या चैतन्याचे वातावरण पसरले असून नागरिकांची खरेदीची लगबग सुरू आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा सांस्कृतिक उत्सव मानला जातो. या पार्श्वभूमीवर नाशिकमध्येही प्रत्येक घराघरात बाप्पाचे आगमन करण्यासाठी सजावट, मुर्तींची निवड आणि पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे. शहरातील विविध बाजारपेठेत बाप्पाच्या मुर्तींची दुकाने उभारण्यात आली असून, लहानापासून ते भव्य अशा विविध उंचीच्या मुर्तींची रेलचेल पाहायला मिळत आहे. विशेषतः पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्तींना यंदा चांगली मागणी असून, अनेक कुटुंबे या मूर्तींना प्राधान्य देत आहेत. घरगुती तसेच मंडळांच्या गणेशोत्सवासाठी आकर्षक सजावटीच्या वस्तूंची दुकानेही गर्दीने फुलली आहेत. रंगीबेरंगी लाइट्स, कृत्रिम फुलांची तोरणे, वॉल हँगिंग्ज, सजावटीच्या पार्श्वभूमी, थर्माकोल व लाकडी डेकोरेशन साहित्याची विक्री जोरात सुरू आहे. सण जवळ येत असल्याने कुटुंबांसह बाजारात खरेदीसाठी आलेल्या नागरिकांच्या चेहऱ्यावर उत्साह स्पष्टपणे दिसत आहे. मुले, युवा वर्ग तसेच ज्येष्ठ मंडळीही खरेदीत सहभागी होत असल्याने बाजारपेठ चैतन्यमय झाली आहे. गर्दीचा विचार करता वाहतूक पोलीस, नगरपालिकेचे कर्मचारी तसेच स्वयंसेवी संस्था यांनी बाजारपेठांमध्ये विशेष व्यवस्था केली आहे. नागरिकांनी सुरक्षिततेची काळजी घेत खरेदी करावी, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे. अशा प्रकारे नाशिक शहर बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज झाले असून, उद्यापासून "गणपती बाप्पा मोरया"च्या जयघोषाने संपूर्ण नगरी दुमदुमणार आहे.

# नाशिकमध्ये उद्योगांच्या विकासासाठी पोषक वातावरण

**सातपूर ।** नाशिक मध्ये उद्योगांच्या विकासासाठी पोषक वातावरण असून आयमा इंडेक्स महा कुंभला जास्तीत जास्त प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न राहील असे प्रतिपादन उद्योग सचिव पी. अन्बलगन यांनी केले. त्यांनी उद्योजकांना मैत्री पोर्टलचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन केले उद्योजकांच्या हितासाठी नवीन उद्योग धोरण आणले जाणार असून त्यात १५ नवीन बाबींचा समावेश असेल असेही सुतोवाच त्यांनी आपल्या भाषणात केले.

नाशिक मध्ये जागतिक स्तराचे (ग्लोबल ब्रँड) ब्रँड तयार करण्याची क्षमता आहे असे उद्योग विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह म्हणाले त्यांनी सुला वाईस आणि सह्याद्री ॲग्रो चे उदाहरण देत लघुउद्योगांना जास्तीत जास्त पाडवळ देण्याचे आश्वासन दिले औद्योगिक विकासात उत्तर महाराष्ट्राचे आणि विशेषता नाशिकचे योगदान महत्त्वाचे आहेत गुंतवणुकीच्या दृष्टीने नाशिकला राज्यात अवस्था मिळवून देण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत असे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सांगितले झूम बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णय यांची अंमलबजावणी जलद व्हावी यासाठी उपसमित्यानेहून त्याद्वारे निर्णय घेण्याचा नाशिक पॅटर्न राज्यभर चर्चेत असून अनेक जिल्ह्यांनी तो स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. आयमातर्फे २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान ठक्कर डोम येथे आयोजित आयमा इंडेक्स महाकुंभ २०२५ च्या सादरीकरणाचा शुभारंभ हॉटेल स्ट्रीट गोविंद नगर येथे उत्साहात पार पडला यावेळी उद्योग सचिव पी. अन्बलगन, उद्योग (विकास) आयुक्त दीपेन्द्र सिंह कुशवाह जिल्हाधिकारी जलद शर्मा आणि महापालिका आयुक्त मनीषा खत्री प्रमुख उपस्थित होते व्यासपीठावर आहे माझे अध्यक्ष ललित बुक सरचिटणीस प्रमोद वाघ आयमा इंडेक्स महाकुंभ 2025 चे चेअरमन वरून तलवार स्पेस बुकिंग कमिटीचे चेअरमन मनीष रावल आणि बीओपीपी कमिटी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे उपस्थित होते बूब यांनी प्रास्ताविक केले.

**३५० पेक्षा जास्त वातानुकूलित स्टॉल्स**

ठक्कर डोम येथे होणाऱ्या या औद्योगिक महाकुंभ मध्ये ३५० पेक्षा जास्त वातानुकूलित स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत आतापर्यंत १५० पेक्षा जास्त स्टॉल्सची नोंदणी म्हणजे बुकिंग झाली यावेळी आयमाचे माजी अध्यक्ष धनंजय बेळे ,जे आर वाघ, एस एस बिर्दी, संदीप सोनार राजेंद्र अहिरे बिपिन बटाविया आयमाची उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे उमेश कोठावदे सरचिटणीस प्रमोद वाघ सचिव योगिता आहेत खजिनदार गोविंदा दिलीप वाघ अविनाश मराठे जयदीप अलीमचंदानी जगदीश पाटील राहुल गांगुर्डे जयंत पगार हेमंत खोड रवींद्र झोपे, अविनाश बोडके, रवींद्र महादेवकर सुमित बजाज कुंदन डरंगे राजेंद्र वडनेरे राजेंद्र कोठावदे अभिषेक व्यास श्रीलाल पांडे, रवी श्यामदासांनी विनोद कुंभार श्वेता चांडक मनोज मुळे नागेश पिंगळे रणजीत सानप सुरज आव्हाड प्रतीक पगारे सुमित तिवारी शरद दातीर कमलेश उशीर योगेश पाटील जय महाजन उपस्थित होते.

# गणेशोत्सव : राज्य महोत्सव

यंदा राज्य शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा दिल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळख अधिक गडद होणार आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे. या विषयीच्या विविध निर्णयांची माहिती देणारा हा लेख.

-------------

महाराष्ट्रामध्ये गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, जिथे तो एक सार्वजनिक उत्सव बनला आहे. १९ व्या शतकात, लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला एक सार्वजनिक सण म्हणून सुरू केले, ज्यामुळे तो अधिक लोकप्रिय झाला. विशेषतः मुंबई - पुण्याचा गणेशोत्सव जगप्रसिद्ध आहे. जगात आणि देशात आपल्या गणेशोत्सवाची ओळख सर्वात मोठा महोत्सव म्हणून झालेली आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून घोषित केला आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. महाराष्ट्र शासनाने यंदा गणेशोत्सवाला ह्रराज्य महोत्सवह्व म्हणून घोषित केल्याने विशेष आनंद आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी असते.

आता गणेशोत्सव प्रथमच राज्य शासन साजरा करत असल्याने हा उत्सव आता अधिक व्यापक प्रमाणात साजरा करून त्यात लोकसहभाग वाढवावा हा मुख्य उद्देश आहे. यासाठी प्रत्येक विभागांनी विविध उपक्रमातून आपली सहभागीता वाढवून आपापल्या समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करावी, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड.आशिष शेलार यांनी सर्व राज्य आणि केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता २२ देशांमध्ये साजरा होतो. सार्वजनिक तसेच घरगुती पद्धतीने आणि आता राज्य शासनामार्फतही साजरा होणारा हा गणेशोत्सव सर्व धर्म, जात, भाषांना जोडणारा उत्सव असावा. या गणेशोत्सव काळात तालुका ते राज्य स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धांसाठी १० कोटी रुपयांची बक्षिसे ठेवली गेली असून समाज माध्यमांवरून विशेष मोहीम राबवली जात आहे.

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीतर्फे उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करणे. राज्यातील सुमारे ४८० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सुमारे १.५० कोटी रुपये इतक्या रकमेची पारितोषिके वितरित करण्यात येणार आहेत

गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक विभागाने नाट्य, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्कोचा दर्जा मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विषय घेऊन कार्यक्रम राबविण्यात यावेत. घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सवाचे फोटो-व्हिडिओ जगभरातून अपलोड करता यावेत, यासाठी विशेष प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यात प्रमुख मंडळांचे थेट प्रक्षेपण सुद्धा उपलब्ध होणार आहे.

त्याचबरोबर चित्रपट महोत्सव, शैक्षणिक कार्यक्रम आदी विषयांवर निबंध, चित्रकला, ब्लॉग स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात, अशा सूचनाही शासनाने दिल्या आहेत.

गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या काळात आपापल्या विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ऑपरेशन सिंदूरद्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात यावा. तसेच आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना यांचा गौरव करण्यात यावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

गणेशोत्सवाला ह्रराज्य महोत्सवह्व दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळख अधिक घट्ट होणार आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे.

वर्षानुवर्षांची परंपरा असलेला गणेशोत्सव यावर्षी राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यास शासनाची यंत्रणा सज्ज झाली असून गणेशोत्सव मंडळे व घरगुती गणेश आरास स्पर्धा, चौकाचौकात रोषनाई, ड्रोन शो, विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा प्रकारे जल्लोषात गणेशोत्सव साजरा होणार आहे.



**अनिल आलुरकर**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.**

शासन निर्णयानुसार तालुका स्तरापासून राज्य स्तरावर विविध गणेशोत्सव मंडळ जे धार्मिक प्रथा परंपरानुसार सहभागाने पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रमात काम करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना पारितोषिकाची घोषणा केली आहे. तसेच गिरगाव चौपाटीवर ड्रोन महोत्सव आयोजन करण्यात येणार असून पुणे, नाशिक, नागपूर, मुंबई आणि राज्यातील सर्व भागात स्थानिक स्तरावर शक्य असेल त्या सार्वजनिक ठिकाणी रोषणाई करण्यात येणार असून गणेशोत्सव काळामध्ये भजनी मंडळांना भजनामधील साहित्यासाठी थेट लाखो रुपयांचे अनुदान देण्याची योजना घोषित झाली आहे. परदेशातही गणरायाचे आगमन धुमधडाक्यात व्हावे, म्हणून हा राज्य महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा व्हावा, ही भूमिका घेण्यात आली आहे.

या महोत्सवांतर्गत, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरांवर होणार आहे. या स्पधचे अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्य पोर्टल द्वारे ऑनलाइन स्वरूपात स्वीकारले जात आहेत.

ही स्पर्धा विनामूल्य आहे. नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. विजेत्या मंडळांना तालुकास्तरावर एक, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी गौरविले जाणार आहे

यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिद्ध गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन अकादमीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे.

आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिद्ध करता येईल. याकरीता अधिकाधिक मंडळांनी व कुटुंबांनी आपल्या गणपतीची छायाचित्रे पोर्टल द्वारे प्रसिद्ध करावीत व सर्वांना श्री गणरायाचे दर्शन घेता येईल याची व्यवस्था करावी.

हा गणेशोत्सव- राज्य महोत्सवाचा शासन निर्णय गणरायाच्या चरणी घोषित करताना आनंद होत असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी सांगितले. याबाबत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा आणि विविध कार्यक्रम यांचे दोन स्वतंत्र सविस्तर शासन निर्णयही जारी करण्यात आले आहेत. पु. ल. देशपांडे कला अकादमी आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे या महोत्सवाचे नियोजन व समन्वय करण्यात येत आहे.

गणेशोत्सवात यंदा शासनाचा सहभाग मोठ्या प्रमाणात राहणार आहे. गणेशोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले असून शासकीय आस्थापनाच्या इमारती, वारसास्थळांवर या बोधचिन्हाची रोषणाई करण्यासोबत महत्त्वाच्या चौकाचे सुशोभीकरण करुन रोषणाई करावी. संपूर्ण राज्यभर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

महाराष्ट्राची कला व संस्कृती आणि परंपरेचे दर्शन या कार्यक्रमांतून घडेल. हे कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाही तर महाराष्ट्राबाहेर ज्या ठिकाणी मराठी बांधव मोठ्या प्रमाणात आहेत त्या ठिकाणीही करण्यात येत आहेत. तसेच मराठी भाषिक बहुल भारताबाहेरील काही देशामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

काही ठिकाणी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने अध्यात्म नाट्यरंग महोत्सवाचेही आयोजन करण्यात येत आहे. ज्या चित्रपटांमधून गणपती विषयक परंपरा, कला संस्कृती दर्शवलेली आहे, अशा चित्रपटांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवावर आधारित टपाल तिकीट आणि नाणे काढण्यात येईल. संपूर्ण राज्यभरातून गणपतीविषयक रिल्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ह्यड्रोन शोह्ल चे आयोजन करण्यात आले आहे. या राज्य महोत्सवाची माहिती संपूर्ण देशभर व्हावी यासाठी वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, रेडिओ आणि समाज माध्यमे यांच्या माध्यमातून देशभरात प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष कार्यक्रम, उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. उत्सवाच्या दरम्यान प्रमुख ठिकाणी विद्युत रोषणाई व सुशोभिकरण करण्यात येणार आहे. पारंपरिक भजन व आरती सादर करणाऱ्या भजनी मंडळांना साहित्य वाटप, अनुदान देण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. विसर्जन सोहळ्यामध्ये आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी विविध सोयी-सुविधा व वाहन व्यवस्था उपलब्ध करण्यात येणार आहे. राज्यात शिकत असणाऱ्या देशाबाहेरील विद्यार्थ्यांना या महोत्सवात सहभागी होण्यासाठी योजना, उपक्रम राबविण्यात येत आहे.




## महाराष्ट्राचा राज्य उत्सव

यंदाच्या गणेशोत्सवात ७ दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत परवानगी जिल्हाधिकाऱ्यांना परवानगी देण्यात आली असून याबाबत प्रशासनाने गणेश मंडळ, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेतला आहे.

प्रसिद्ध गणेश मंडळे, गणेश मंदिरांनी भक्तांकरिता थेट प्रक्षेपणाद्वारे घरातूनच दर्शनाची सोय उपलब्ध करुन द्यावी, केंद्रीय राज्य राखीव पोलीस दलाचा बँड शो आणि पोलीस दलांचा बँड शो तसेच डॉग शोचे आयोजन करावे. शाळा, महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजनांचे विद्यार्थी, सामाजिक संस्थांना सहभागी करुन उपक्रमाचे आयोजन करावे.

महावितरणने गणेश मंडळांना वीज उपलब्ध करुन द्यावी. आरती करणाऱ्या भजनी मंडळाना मोफत साहित्य वाटप करण्यात यावे. विसर्जन मार्गावर ड्रोन शोचे आयोजन, जाहिरात फलकांवर सामाजिक संदेश देण्याची कार्यवाही करावी. विदेशी विद्यार्थी, नागरिक, विदेश दुतावासातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे. भारतीय हवामान विभागाकडून पावसाबाबत देण्यात येणाऱ्या अंदाजानुसार प्रशासनाने तयारी करावी.

गणेशोत्सवानिमित्त सर्वांचा सन्मान झाला पाहिजे, अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाजघटकांना सामाजिक सलोख्यासाठी एकत्रित आणावे. विविध सांस्कृतिक विषयांचे जतन व संवर्धन करण्याबाबत तालुका आणि जिल्हास्तरावर विविध स्पर्धा आयोजित कराव्यात.

मराठी संस्कृती, कलाकार, परंपरांना प्रोत्साहन देण्याकरीता मराठी नाट्यमहोत्सव आयोजित करण्यात यावा. विविध विषयांबाबत व्याख्यानमाला, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करावे. समाजमाध्यमाद्वारे व्यापक स्वरुपात प्रसार आणि प्रचार करावा. गणेश मंडळांनी ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी.

यावर्षीच्या गणेशोत्सवामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी भारताने जगाला ऑपरेशन सिंदूरद्वारे दाखविलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी. स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान करुन त्यांच्या कर्तृत्वावर आधारित माहिती फलक लावावेत. मंडळांनी प्रशासनासोबत समन्वय ठेवून हा गणेशोत्सव शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा. यंदाचा गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून सर्वांच्या स्मरणात राहील असाच साजरा करावा हीच गणेशभक्तांकडून अपेक्षा.

# भारत रशिया मैत्रीचा नवा अध्याय



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली आहे.

सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही.

भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला. अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले.

मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी फोनवरून संवाद साधत चर्चा केली.

आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची असल्याने या भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून आहे. एस जयशंकर यांनी या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली या भेटीत अनेक विषयावर चर्चा झाली मात्र भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पदार्पाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली.

विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे.

रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला. या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली.

आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते. अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते. शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती. आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. हे दोन देश पुन्हा एकत्र आले त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात.

अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे.

ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे हे मात्र नक्की.

■ ■ ■



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

# तिकिटांचा काळाबाजार त्यात कोकणकरांचे हाल!

शिमगा आणि गणपती हे कोकणातील पारंपारिक उत्सव. गेल्या काही वर्षांत कोकणपट्टीत राहणाऱ्या जवळपास प्रत्येक घरातील किमान एक माणूस नोकरी व्यवसायासाठी मुंबई ठाण्यात येऊन राहिला आहे. त्याच्यातील काहींची तिसरी तर काहींची चौथी पिढी आज या शहरांत राहत आहे, शिक्षण घेऊन नोकरी व्यवसाय करत आहे. असे असले तरी या सर्वांची नाळ अजूनही कोकणातील आपल्या गावाशी, घराशी आणि कुटुंबाशी घट्ट जोडलेली असल्याने दोन सणांच्या निमित्ताने जवळपास प्रत्येक कोकणकर आपल्या गावी जायला निघतो.

गणपती अगदी तोंडावर आल्याने आत्ता गणपतीत गावी जाण्याची सिद्धता या सर्वांची सुरु झाली आहे, कार्यालयातून सुट्टी घेणे. गणपतीच्या सजावटीचे साहित्य खरेदी करणे, कुटुंबासाठी नवीन कपडे खरेदी करणे आदींसोबत गावी जाण्यासाठी तिकीट मिळवण्याची धडपडही सुरु झाली आहे. कोकणात रेल्वे सुरु झाल्यापासून कोकणकरांची मोठी सोय झाली आहे त्यामुळे कोकणकर पहिले प्राधान्य रेल्वेला देतात. कोकणकरांच्या सोयीसाठी कोकण रेल्वे प्रशासन या दोन सणांच्या निमित्ताने दरवर्षी जादा गाड्या सोडते, यंदाही प्रशासनाच्या वतीने जादा रेल्वे आणि एस टी बसेस सोडण्यात येणार आहेत. मात्र दरवर्षी या सर्व रेल्वेगाड्या फुल्ल झालेल्या पाहायला मिळतात. ऑनलाईन तिकीट बुक करणाऱ्यांनाही हाच अनुभव येतो. तात्काळ बुकींगच्या बाबतीतही हा अनुभव आज अनेकांनी घेतला आहे. त्यामुळे या बुकिंग जातात कुठे हा यक्षप्रश्न यानिमित्ताने प्रत्येकालाच पडतो.

मग सुरु होते तिकीट मिळवण्यासाठीची धडपड. कोणाच्या ओळखीने तिकीट मिळते का? बुकिंग एजंटकडे तिकीट मिळते का याचा शोध घेतला जातो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तासनतास रांगेत उभे राहूनही तिकीट मिळत नाही मात्र या एजंट मंडळींना अधिकचे पैसे देऊन सहज तिकीट मिळते. मग या एजंट मंडळींकडे तिकीट येते तरी कुठून ?

अर्थातच यामागे मोठा भ्रष्टाचार लपला असून रेल्वेतील अधिकारी मंडळींपासून तिकीट बुक करणारे कर्मचारीही या साखळीत सहभागी झालेले असतात. ऑनलाईन तिकीट बुकींगच्या बाबतीत केला जाणारा मोठा स्कॅम आयआरटीसीने शोधून काढला आहे. जानेवारी ते मे २०२५ दरम्यान आयआरसीटीसीने तब्बल २.९ लाख अशी तिकीट बुकिंग्स शोधून काढली आहेत. तिकिट बुकिंग सुरु झाल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांमध्ये तिकीटे बूक केली जातात; मात्र ही सर्व तिकीटे एजंट मंडळींकडून केली जात असल्याचे उघड झाले आहे. ही तिकीटे ज्या खात्यांवरुन खरेदी केली जातात ती खाती खोटी माहिती देऊन आणि ऑटोमॅटिक तंत्रज्ञान वापरुन हाताळ्ली जातात. ज्यामुळे वेळातच या खात्यांवरुन तिकीटे बुक केली जातात आणि सर्वसामान्यांच्या हाती लागते ती केवळ निराशा.

उत्सवाच्या काळात आणि सुट्ट्यांच्या काळात तिकीटांचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात होतो. जेव्हापासून कोकण रेल्वे सुरु झाली आहे तेव्हापासून दरवर्षी हा त्रास कोकणकरांना सहन करावा लागत आहे. यावर उपाय काढणार तरी कोण?

■ ■ ■



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### अवयव दान

**मृत्यु होता व्यक्तिचा**
**केला जातो**
**अग्नीदहन संस्कार**
**शेवटी काय तर**
**शरीराची**
**राखच होणार..!**

**त्यापेक्षा मरावे परी**
**किर्ती रुपे उरावे**
**अवयव दान करुन**
**गरजवंतांना**
**जीवदान द्यावे..!**

## हरितालिका : अखंड सौभाग्याचे व्रत!


**वाचक लिहितात**

भाद्रपद शुद्ध तृतीयेला हरितालिका व्रत केले जाते. माता पार्वतीने भगवान शिवाची वर प्राप्ती व्हावी म्हणून हे व्रत केले होते. आणि या व्रतामुळेच त्यांना भगवान शिव पति रूपाने मिळाले. त्यामुळे मनासारखा वर मिळावा यासाठी कुमारिका आणि अखंड सौभाग्य लाभावे यासाठी विवाहित स्त्रिया हे व्रत करतात.

या व्रतात भगवान शिव-पार्वती यांचे प्रतीक म्हणून शिवपिंडीची पार्वतीसह स्थापना करून त्याची पूजा केली जाते. पूजनाच्या वेळी सोळा प्रकारची पत्री, बेल, फुलं , धोत्र्याचे फळ शिवपिंडीवर वहातात. पूजेच्या वेळी प्रज्वलित केलेला दिवा विसर्जनापर्यंत, म्हणजे दुसऱ्या दिवसापर्यंत अखंड तेवत ठेवला जातो. स्त्रिया रात्रभर जागरण करून स्तोत्र, भजन, भगवान शिवाचे नामस्मरण करतात. हरतालिका व्रताची कथा वाचतात. जीवनातील विघ्ने दूर व्हावीत आणि अखंड सौभाग्य लाभावे, यासाठी भगवान शिवाला प्रार्थना केली जाते. या व्रतात निर्जळ उपवास करणे याला विशेष महत्त्व आहे. या व्रताच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये आत्मबल वाढते आणि आयुष्य अधिक मंगलमय होते. या पवित्र हरितालिका व्रताच्या निमित्ताने सर्व स्त्रियांना मंगलमय जीवन आणि भगवान शिव-पार्वतींचे आशीर्वाद लाभोत, हीच प्रार्थना!

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा**

# दह्यात मीठ घालावं की साखर?



दही म्हटलं की अनेकांच्या आवडीचा पदार्थ. जेवणातला आणि आरोग्याच्या बाबतला सर्वाच महत्त्वाचा भाग.

अनेकांना तर रोजच्या जेवणात दही हे लागतच. मुख्य म्हणजे दही जेवणाची चव वाढवतं आणि दुसरं म्हणजे आणि पचन सुधारतं. अनेकजण दह्यात काही मिसळून खाण्याऐवजी असचं दही खातात, तर काहीजण दह्यात साखर किंवा मीठ मिसळून खातात. पण नक्की प्रश्न असा आहे की दह्यात मीठ घालावं की साखरं? कोणतं सर्वात जास्त फायदेशीर असतं? जाणून घेऊयात.

**दही खाण्याची योग्य पद्धत नक्की कोणती?**

काही लोक दह्यात साखर घालून खातात, तर काही लोक चव वाढवण्यासाठी मीठ आणि कधीकधी जिरे पावडर किंवा सॅलडमध्ये दही घालून ते खातात. काही गावांमध्ये तर लोक वर्षभर मीठ घालून दही खाणे पसंत करतात, पण ही सवय आरोग्यासाठी चांगली आहे का? दही खाण्याची योग्य पद्धत नक्की कोणती आहे ते जाणून घेऊया.

**साखरेसोबत दही खावे की मीठ खावे?**

आहारतज्ज्ञांच्या मते साखरेसोबत दही खाणे अधिक फायदेशीर आहे. त्याचबरोबर, गुळासोबत दही खाणे हा देखील एक आरोग्यदायी पर्याय मानला जाऊ शकतो. दुसरीकडे, मीठ घालून दही खाणे टाळावे. जर तुम्हाला ते खायचेच असेल तर जेवताना चवीनुसार थोडे काळे मीठ किंवा खडा मीठ घालावं.

असं दही खाल्लं तर आरोग्याला फायदा होण्याऐवजी नुकसान होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, दह्यात मीठ घालून ते जास्त काळ ठेवल्याने त्यात असलेल्या लॅक्टोबॅसिलस बॅक्टेरियाच्या पेशींवर वाईट परिणाम होतो, ज्यामुळे दह्याचे पोषक तत्वे कमी होतात. तसेच आरोग्याला फायदा होण्याऐवजी नुकसान होऊ शकते.

दुसरीकडे, संधिवात, दमा, सांधेदुखी, मूत्रपिंड आणि सर्दी असलेल्या रुग्णांनी तर दही खाऊच नये. पावसाळ्यात पचनसंस्था कमकुवत होते, म्हणून दही खाणे टाळावं किंवा ते मर्यादित प्रमाणात मर्यादित खावं.

**दही खाण्याची उत्तम वेळ**

तसेच, दही खाण्याची उत्तम वेळ म्हणजे दुपारच्या जेवणात. रात्री कधीही दही खाऊ नये. कारण रात्री दही खाल्ल्याने गॅस, पोटफुगी आणि जडपणा येऊ शकतो. योग्य वेळी, योग्य पद्धतीने आणि योग्य प्रमाणात दही खाल्ले शरीरासाठी फायदेशीर असते. आणि जरी रात्रीच्या जेवणात दही खायचेच असेल तर ते नुसतेच खाण्यापेक्षा सॅलेडमध्ये थोडेसे घालून खाऊ शकता.

■ ■ ■

# अलिबागमधील जमीन प्रकरणात सुहाना शाहरुख खान अडचणीत

## ॲड. विवेक ठाकूर यांनी शासनाकडे दाखल केली तक्रार

अलिबाग, दि. २५ : प्रतिनिधी

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानची लाडकी लेक सुहाना खान सध्या चर्चेत आहे. तिने आलिबागमध्ये शेती करण्यासाठी 1 जून 2023 रोजी दीड एकर जमीन विकत घेतली आहे. जमिनीचा व्यवहार आणि नोंदणीदेखील 1 जून रोजीच झाली होती. या जागेची एकूण किंमत 12.91 कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या दीड एकर जागेत 2218 चौरस फूट बांधकामही करण्यात आले आहे. मात्र, ही जागा सरकारी असल्यामुळे तसेच जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता हा व्यवहार झाल्याचे सुहाना खान अडचणीत सापडली आहे.

अलिबाग तालुक्यातील थळ येथील सरकारी मालकीच्या जमिनीची विक्री बॉलीवूड आयकॉन शाहरुख खानची मुलगी सुहाना खान हिला शर्थभंग करून कथित बेकायदेशीरपणे विक्री केल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते व वकील ॲड. विवेक ठाकूर यांनी दोन वर्षे पाठपुरावा करून पुराव्यांसह शासनाकडे या घोटाळ्याबाबत तक्रार दाखल केली आहे.

**काय आहे प्रकरण?**

थळ येथे समुद्रकिनारी असलेली सर्व्हे क्र. 345/2, क्षेत्रफळ 0.60.70 हे.आर जमीन सन 1968 मध्ये कडक ना विक्री कलमाअंतर्गत लागवडीसाठी मंजूर केलेली सीआरझेडमधील जमीन खोटे कुटूंबाने जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय केवळ साठेकराराव्दारे 12.91 कोटी रुपयांना विकली असल्याची तक्रार ॲड. विवेक ठाकूर यांनी शासनाकडे दाखल केली आहे. या तक्रारीत महसूल अधिकारी, उपनिबंधक आणि साक्षीदारांवर संगनमत, सीआरझेडचे उल्लंघन, खोटे तपासणी अहवाल सादर करणे आणि कोट्यवधी रुपयांचा राज्य महसूल लपवल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने सर्व विक्री कागदपत्रे रद्द करण्याची, भरपाईशिवाय जमीन सरकारजमा करण्याची आणि अनेक उच्चस्तरीय आदेशांना न जुमानता कारवाई करण्यास उशीर करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांसह सर्व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**सुहाना शाहरूख खान वादातील जमीन कोणती?**


थळ सर्व्हे क्र. 345/2, क्षेत्रफळ 0.60.70 हे.आर. ही जमीन 1968 मध्ये लागवडीसाठी अटींसह नारायण विश्वनाथ खोटे यांना देण्यात आली होती. त्या जमिनीला जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय इतर वापरास व विक्रीस बंदी होती.

1968-69 साली या जमिनीची लागवडीसाठी वापर व झाडे लावण्यासाठी नारायण विश्वनाथ खोटे यांना शासनाकडून परवानगी देण्यात आली होती. ही जमिन देताना जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या परवानगीशिवाय विक्री/तबादला/गहाण व्यवहार बंदी अशी प्रमुख अट नमूद केली होती. त्यानंतर नारायण विश्वनाथ खोटे यांचे वारस असलेल्या अंजली खोटे, रेखा खोटे व प्रिया खोटे यांनी ही जमीन वर्ग 2 मधून वर्ग 1 मध्ये रूपांतर करण्याचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केला होता. मात्र त्यावर अद्यापही परवानगी मिळालेली नाही.

**तक्रारदाराचे आरोप**

वारस अंजली, रेखा व प्रिया खोटे यांनी 1 जून 2023 रोजी 12.91 कोटी रुपयांना सुहाना शाहरूख खान हिला नोंदणीकृत साठेकराराद्वारे वर्ग-2 ची जमीन बेकायदेशीरित्या विकली. यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांची परवानगी घेतली नाही. जमीन हस्तांतरणासाठी अंजली, रेखा व प्रिया खोटे यांनी 14 फेब्रुवारी 2022 मध्ये वर्ग 2 ते वर्ग 1 करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे अर्ज केला. परंतु या अर्जानुसार त्यांना परवानगी दिलेली नाही हे माहिती अधिकारामध्ये उघड झाले आहे. महसूल विभागाच्या कायदेशीर परवानगीशिवाय साठेकराराव्दारे 12.91 कोटीला सुहाना शाहरूख खान यांना ती जमिन विक्री करण्यात आली.






**कोस्टल रेग्युलेशन झोनमध्ये जमीनीची नोंद**

या जागेत अनधिकृत बांधकामे (घर नं. 1770, 1771, 367) करण्यात आली. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी नाही. तरीही तत्कालीन मंडळ अधिकारी आर.एन. मांढरे यांनी जमिनीवर कोणतीही बांधकामे नाहीत, असा खोटा अहवाल तहसिलदार यांच्याकडे सादर केला. या अहवालातील पंचनाम्यावरील सह्या करणाऱ्या व्यक्ती सुहाना शाहरूख खान यांच्या वडिलांच्या कंपनीशी निगडीत असल्याचा ॲड.ठाकूर यांचा आरोप आहे. तसेच माजी मंडळ अधिकारी आर.एन. मांढरे यांच्यावर खोटी माहिती व तपासाचा गैरवापर केल्याचा तसेच सब-रजिस्ट्रार व महसूल कर्मचारी यांचे संगनमत असल्याचा आरोप तक्रारदार ॲड.ठाकूर यांनी केला आहे.

**तक्रारदारांची मागणी**

जमीन सरकार ताब्यात घेऊन जनकल्याणासाठी राखीव ठेवावी. साठेकरार व संबंधित सर्व कागदपत्रे रद्द करावीत. विक्रेते, खरेदीदार, अधिकाऱ्यांवर व पंचांवर कायदेशीर कारवाई करावी. चौकशी लवकर पूर्ण करून जबाबदारांवर गुन्हा दाखल करावा.

**कायदेशीर विश्लेषण**

**1) जमिनीचा दर्जा आणि अटी**

ही जमीन भोगवटादार वर्ग 2 मध्ये असून 1968 च्या जिल्हाधिकारी आदेशान्वये नारायण विश्वनाथ खोटे यांना लागवडीसाठी देण्यात आली होती.

त्या आदेशात जिल्हाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी शिवाय विक्री, गहाण किंवा हस्तांतरण करता येणार नाही. परवानगीशिवाय हस्तांतरण झाल्यास जमीन परत सरकारकडे जमा करण्याचा स्पष्ट अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असल्याचे नमूद आहे.

**2) साठेकराराचे स्वरूप**

31 मे/1 जून 2023 रोजी अंजली, रेखा व प्रिया खोटे यांनी सुहाना शाहरूख खान हिच्यासोबत नोंदणीकृत साठेकरार केला.

कायद्यानुसार साठेकराराने मालकी हस्तांतर होत नाही. अंतिम मालकीसाठी नोंदणीकृत खरेदीखत आवश्यक असते. या व्यवहारात खरेदी खत झालेले नाही. परंतु नोंदणीकृत साठेकरार करून सरकारचा हक्क असलेल्या जमिनीसाठी 12 कोटी 91 लाख रुपये देणे व स्वीकारणे हे बेकायदेशीर आहे. या जमिनीच्या अटींनुसार हा साठेकरारही हस्तांतरणाचा प्रयत्न मानला जाऊ शकतो.

**3) कायद्याचे संभाव्य उल्लंघन**

परवानगी न घेता व्यवहारजिल्हाधिकारी रायगड यांची मंजुरी नसताना सरकारी अटींच्या अधीन जमीन विक्रीसाठी करार करण्यात आला. सीआरझेड नियमांचे उल्लंघन करुन जमीन -1 क्षेत्रात असून त्यावर बांधकामे असल्याचा उल्लेख नाकारला गेला. मंडळ अधिकाऱ्याने बांधकाम नाही असा अहवाल दिला. जो तक्रारदारांच्या मते खोटा आहे. या व्यवहारातून 12.91 कोटी रुपयांचा मोबदला झाला पण शासनाला ठराविक महसूल/अधिमूल्य मिळाले नाही.

# भिवंडी वाडा मार्ग ठरला मुत्यूचा सापळा, सर्वात मोठे जीवघेणे खड्डे याच मार्गावर

## आतापर्यंत 12 वर्षांत 600 हुन अधिक नागरिकांचा अपघातात मृत्यू

भिवंडी, दि. २५ : प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यातील भिवंडी - वाडा मार्गांवर दरवर्षी प्रमाणे लाखो जीवघेणे खड्डे निर्माण झाले असून या खड्ड्यामुळं अपघात होऊन गेल्या बारा वर्षात ६०० हुन अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याच समोर आले.तर केवळ या तीन वर्षात ७५ नागरिकांचा अपघातात मृत्यू झाल्यानं या गंभीर घटनेला जबाबदार असलेल्या ठेकेदारसमोर मात्र शासकीय यंत्रणा हतबल झाल्याचा आरोप श्रमजीवी संघटनेचे प्रवक्ते प्रमोद पवार यांनी केला आहे.विशेष म्हणजे गेल्या १२ वर्षापासून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आंदोलन केली जात असतानाच त्यावर संबधित विभागाकडून ठेकेदाराचे उखळ पांढरे करून कोट्यवधींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप प्रवक्ते प्रमोद पवार यांनी केला आहे .भिवंडी ते वाडा हा ४० कि.मी. अंतराचा रस्ता निकृष्ट दर्जाचा झाला असून प्रत्येक पावसात हा मार्ग खड्डेमय होताना दिसतो. त्यावर थातूरमातूर डागडुजी केली जाते. पुन्हा पावसाळयात 'ये रे माझ्या मागल्या' अशीच स्थिती होते. या रस्त्याच्या अपूर्ण कामाकडे लक्ष वेधण्यासाठी पाच वर्षात अनेक आंदोलने झाली. मात्र प्रशासन याकडे गांभीर्याने बघत नसल्याने आजही निष्पाप लोकांचे जीव जात असून कित्येकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदी असताना त्यांनी स्वत: या रस्त्याची पाहणी केली होती. त्यानंतर ८०१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला.सध्या भिवंडी-वाडा-मनोर रस्ता मृत्यूचा सापळा झाला आहे. या ६४ किमी रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. तब्बल ८०१ कोटी रुपयांचा निधी ईगल इन्फ्रा कंपनीला देण्यात आला आहे. तर ८० कोटी या मार्गावर काँक्रीट पॅच मारण्यासाठी मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे या मार्गावर ८८१ कोटी मंजूर झाल्यानंतरही कामांचा दर्जा आणि गती अत्यंत संथ असून, नागरिकांच्या जीवाला रोज धोका निर्माण झाला आहे.या मार्गावर बारा वर्षात अपघातात ६०० हुन अधिक जणांना जीव गमवावा लागला आहे.तर अनेकजण जखमी झाले असल्याची आकडेवारी समोर येत आहे. या रस्त्याच्या अपूर्ण कामाकडे लक्ष वेधण्यासाठी अनेक आंदोलने झाली. मात्र प्रशासन याकडे गांभीर्याने बघत नसल्याने आजही निष्पाप लोकांचे जीव जात असून संसार उघड्यावर पडले आहेत. प्रशासन आता जागृत झाले. स्थानिक आमदार आणि लोकप्रतिनिधी यांच्यात झालेल्या बैठकीत भिवंडी-वाडा-मनोर रस्त्यावर पडलेले खड्डे भरण्याचे काम सुरू झाले आहे.भिवंडी तालुका आणि वाडा तालुका परिसरातील ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात गणेशोत्सव सण साजरा केला जातो. गणेशाच्या मूर्ती याच भिवंडी-वाडा-मनोर मार्गावरून नागरिक घरी घेऊन जातात. आता पावसाने पडलेल्या खड्ड्यामुळे नागरिकांनाच वाहनातून जाताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. यामुळे गणेशोत्सवात श्री गणेशाच्या मूर्ती घेऊन जाण्यापूर्वी तरी हा रस्ता खड्डेमुक्त करा, अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिक करत आहेत. जिल्हा प्रशासनाकडून अद्यापही याच रस्त्याच्या कामात कोट्यवधींचा मलिदा खाणाऱ्या जिजाऊ कन्ट्रक्शन ला काळया यादीत टाकून त्यांचावर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करीत असल्याने पुन्हा उग्र अंदोलन छेडणार असल्याचे प्रवक्ते प्रमोद पवार यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.







# मनमाड-इंदूर रेल्वे भूसंपादनासाठी विशेष समिती

मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी

मनमाड-इंदूर रेल्वे मार्गासाठी होणाऱ्या भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय होणार नसल्याची ग्वाही देत यासाठी एक विशेष समिती स्थापन करून पुनःसर्वेक्षण करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी दिले.

प्रस्तावित मनमाड-इंदूर रेल्वे मार्ग प्रकल्पात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांना योग्य आणि वाढीव मोबदला मिळावा, यासाठी आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला पणन मंत्री जयकुमार रावल, धुळे जिल्हाधिकारी आणि भूसंपादन अधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

यावेळी बाधित शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. भूसंपादनासाठी त्यांना योग्य मोबदला मिळत नाही. त्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले. प्रति चौरस मीटर दराने मोबदला, महापालिका हद्दीतील जमिनींना वाढीव दर, पिकांचे आणि विहिरींचे योग्य मूल्यांकन तसेच रेल्वे मार्गामुळे शेतांचे झालेले तुकडे आणि पुराच्या पाण्याचा धोका यांसारख्या समस्यांचा निवेदनात समावेश आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः बाधित शेतकऱ्यांबरोबर बैठक घेऊन त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात आणि त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करताना प्रशासनाने पूर्ण दक्षता बाळगावी. भूसंपादन प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहता कामा नये आणि शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे,असे निर्देश बावनकुळे यांनी यावेळी दिले.तसेच रेल्वे मार्गामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे दोन भाग झाल्यास पर्यायी व्यवस्था करण्याचे आणि पूरहानी टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची सूचना बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिली.


## आज का अंदाज

मंगळवार २६ ऑगस्ट २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| ५७८ | १५५ | २३९ | २६९ | ६८९ | २४९ | २४० | १३५ |
| १३६ | २२७ | ५९० | ४५८ | ४९० | ४५६ | ३६७ | ३६० |
| ३७० | ३८० | ३४७ | ३४० | ५८० | ३५७ | ४५७ | ५६८ |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३० | ५० | ६८ | ९८ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३४ | ५२ | ६७ | ९७ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३४ | ५४ | ६१ | ९१ |

२६ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६० | ९० |
| २४ | ५४ | ६४ | ९४ |
| २८ | ५८ | ६८ | ९८ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

२ ५ ४ ३ ७

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## क्रोमाच्या फेस्टिव्ह टेक ऑफर्ससह यंदाच्या गणेश चतुर्थीला ६०%* पर्यंतची मोठी बचत घरी आणा



**नागपूर, २५ ऑगस्ट :** टाटा परिवारातील एक सदस्य आणि भारतातील आघाडीचे ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमा यांनी गणेश चतुर्थीच्या निमित्ताने ऑगस्टमध्ये विशेष ऑफर आणल्या आहेत. या ऑफर २२ ते २९ ऑगस्ट दरम्यान महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश, तामिळनाडू आणि गोवा येथे सुरू आहेत. क्रोमा स्टोअरमध्ये आणि क्रोमा.कॉम वर खरेदी करून या ऑफर्सचा लाभ घेता येईल. इन्स्टन्ट बँक कार्ड डिस्काउंट देखील असल्याने ग्राहकांसाठी बचत करणे अजून जास्त सोपे होईल.

वर्षातील सर्वात मोठे सण लवकरच येतील, त्या दृष्टीने क्रोमाने पार्टी ऑडिओपासून ते रोजच्या स्वयंपाकघरातील आवश्यक वस्तूंपर्यंत अनेक श्रेणींमध्ये आकर्षक ऑफर सादर केल्या आहेत. रिअलमी टीडब्ल्यूएस फक्त ९९९ मध्ये खरेदी करता येईल, पार्टी स्पीकर विथ माइक २,९९९ पासून सुरू होणाऱ्या किमतीत आणि क्रोमाचा २०० वॅट्स पार्टी स्पीकर विथ वायरलेस यूएचएफ माइक फक्त १५,९९० मध्ये मिळेल. सोनी, जेबीएल आणि मार्शलच्या प्रीमियम हेडफोन्सवरील विशेष किमती ग्राहकांच्या उत्साहात आणखी भर घालतील. ग्राहकांना आघाडीच्या व्हॅल्यू ५जी स्मार्टफोन्सवर आकर्षक ऑफर देखील मिळतील*.

ग्राहकांना खरेदी अधिक परवडण्याजोगी करण्यासाठी, क्रोमा ग्राहकांच्या सर्वाधिक पसंतीच्या कालावधीवर सुलभ ईएमआय सुविधा देत आहे. ग्राहकांना उत्पादनांच्या शीर्ष श्रेणींवर एक्सचेंज बोनस देखील मिळू शकतो. बिल मूल्य जितके जास्त असेल तितकी बँक बचत जास्त होईल.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुम्हाला अनेक स्त्रोतांकडून आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता आहे. आज तुम्हाला तुमच्या मुलांकडून चांगली बातमी मिळेल.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी खास असेल. आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी तुमची क्षमता दाखवण्याची संधी मिळेल, ऑफिसमधील प्रत्येकजण तुमची प्रशंसा करेल.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी बदलाचा दिवस असणार आहे. आज तुम्ही तुमच्या दैनंदिन दिनचर्येत बदल कराल. आज तुम्ही एखाद्या संस्थेत सामील व्हाल आणि गरजूंना मदत कराल.

**कर्क :** आज तुमच्या नोकरीत यश मिळण्याची शक्यता आहे आणि तुमचा पगारही वाढू शकतो. कला आणि अभिनयाशी संबंधित लोकांना आज एका मोठ्या व्यक्तिमत्त्वाला भेटण्याची संधी मिळेल.

**सिंह :** आज तुमच्या कौटुंबिक जीवनात आनंद असेल आणि तुम्हाला कामाच्या क्षेत्रात चांगले यश मिळेल. आज तुमचा अनुभव प्रतिष्ठेचे कारण बनेल आणि तुम्हाला समाजात आदर मिळेल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुमचे प्रलंबित काम पूर्ण होईल. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुम्ही कामाच्या ठिकाणी तुमची कामे पूर्ण मनोबलाने पूर्ण कराल.

**तुळ :** आज तुमची आर्थिक स्थिती चांगली असेल.बौद्धिक कामांमध्ये तुम्हाला मान-सन्मान मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. आज तुम्हाला तुमच्या कौटुंबिक जीवनात आनंद मिळेल.

**वृश्चिक :** आज आर्थिक स्थिती चांगली असेल आणि तुम्ही तुमच्या कुटुंबासह सुंदर ठिकाणी जाऊ शकता.आज कोणताही निर्णय घेण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करा. कामाच्या ठिकाणी बढती मिळेल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ राहील. तुम्हाला तुमच्या नोकरीत चांगले निकाल मिळतील. आज परिस्थिती तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज तुम्ही कामाच्या ठिकाणी विरोधकांपासून दूर राहावे.

**मकर :** आज नक्की चांगली बातमी मिळेल, नोकरीत बढतीची तुमची प्रतीक्षा संपेल. आज नवीन पदामुळे कामाचा ताण वाढेल. कुटुंबाच्या समस्या सोडवण्यात यशस्वी व्हाल. कुटुंबासोबत वेळ घालवाल.

**कुंभ :** दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली कामे पूर्ण होतील. आज तुम्हाला कामावर तुमच्या सहकाजयांचा पाठिंबा मिळेल आणि तुम्ही तुमच्या मित्रांसोबत आनंदाने दिवस घालवाल. खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** आज तुमच्या बचत योजना यशस्वी होतील, तुम्हाला गुंतवणूक करण्याची सुवर्णसंधी मिळेल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासह तीर्थयात्रेला जाऊ शकता किंवा एखाद्या चांगल्या ठिकाणी भेट देऊ शकता.

## शब्दकोडे क्रमांक २२०१



**आडवे शब्द :-**
१) भारताचा राष्ट्रीय पक्षी
३) टाळता न येणारे
५) जमीनदार
७) शपथ
९) वैरभाव, शत्रुत्व
१०) शर्त
११) निमित्त
१२) वाघाची मावशी
१३) किरकिर, गडबड, त्रास
१५) एक सुगंधी फूल
१६) विशेष
१८) सोन्याचा पार्वत
२१) कुबेराचा सेवक
२३) भात शिजतानाचा आवाज
२५) ढगाळ हवा
२६) गावाखालची जमीन
२८) वस्तूनिर्मितीची जागा
३०) गंध
३१) अस्वल
३२) खाळ
३३) श्रीमंत माणूस
३६) आकडा, मांडी
३८) चरण
३९) इंद्र
४०) अनुमती
४१) धमकी
४२) एकटा
४३) प्रत्यक्ष कृती
४५) एक उन्हाळी सुगंधी फूल
४९) कबूतर
५०) जोडीदार, मदतनीस
५३) स्थळ, ठिकाण
५५) सदोदित
५८) आठवण
६०) सप्तस्वरातील पहिला स्वर
६१) मत्स्य
६२) सूर्य, चंद्र
६३) नंतर
६५) पशू, जनावर
६६) नाविकदल
६८) जन्म मृत्यू
७१) बडबड्या
७२) विल्हेवाट, निकाल
७३) नाकावरील मोत्याचा दागिना
७४) एक प्रश्नार्थक शब्द

**उभे शब्द :-**
१) मधुमक्षिका
२) अतिशय रूक्षता
३) आठाचा समूह
४) दारावरील खुणेचा आवाज
५) स्तुती करणारा
६) शरीर
७) भारताचा नागरिक
८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
१०) तर्क, अनुमान
११) आजच्या आधीचा दिवस
१४) हट्ट, दुराग्रह
१५) धनी
१७) राजवाडा
१९) आकाश
२०) एक नशा आणणारा पदार्थ
२२) माफ
२३) रम्य
२४) चेष्टा, उपहास
२५) मज्जाव
२७) लहान, सूक्ष्म, पातळ
२९) क्षारयुक्त पाणी
३०) शाब्दिक भांडण
३२) कपाळ फुटणे
३४) बेचव
३५) परस्त्रीशी संग करणारा, यार
३६) स्वीकारणे, पतकरणे
३७) ठाणवई
४१) औषध
४२) पटाईत
४४) कणीदार पीठ
४६) दु:ख, खेद
४७) रक्तवाहिनी
४८) चुलता
५१) कापडाचा एक प्रकार
५२) वीस दस्त्याचे पुडके
५४) एखाद्याच्या विरुद्धच्या तक्रारी
५५) खरगोश
५६) बिना वासाचे पांढरे फूल
५७) ऐक्य, तादाम्य
५९) संगीतातील एक राग
६१) एक सुगंधी वनस्पती
६४) प्रस्थान करणे
६५) जीव
६६) आरोप, संशय
६७) खवा
६९) व्यापारातील फायदा
७०) पौराणिक अश्ववाहन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर






# कलिंगडाचे वजन १५९ किलो!

कलिंगड उन्हाळ्यात शरीराला थंडावा देते आणि ताजेतवाने ठेवते. एका अशा कलगडाची चर्चा ऐकून कुणीही थक्क होईल. हे कलिंगड इतके मोठे होते, की त्याला उचलायला क्रेनची मदत घ्यावी लागली. जगातील सर्वात मोठे कलगड जगासाठी चर्चेचा विषय बनले होते. या विशाल कलगडाचे वजन इतके होते, की त्याला सामान्य माणसाने उचलण शक्यच नव्हते. २०१३ मध्ये अमेरिकेच्या क्रिस केंट यांनी हे कलिंगड पिकवले होते. त्यांच्या मेहनतीचे फळ म्हणून या कलगडाचे वजन तब्बल १५९ किलो भरले, जे 'द वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ गिनीज बुक' मध्ये नोंदवले गेले. हे कलिंगड एका साधारण कलिंगडापेक्षा १५ पट जास्त जड होते. त्यामुळे ते उचलण्यासाठी विशेष यंत्रणा लागली. क्रिस केंट यांनी स्वतःच्या खास बियांपासून हे कलगड पिकवले होते. प्रदर्शनासाठी ते घेऊन जाण्यासाठी त्याला क्रेनचा वापर करावा लागला. हे बघण्यासाठी आजूबाजूच्या लोकांची मोठी गर्दी झाली होती. या घटनेने सर्वांनाच आश्चर्यचकित केले होते. हे कलगड क्रेनने उचलून एका खास जागी ठेवले होते, जेणेकरून त्याचे वजन आणि आकार सर्वसामान्यांना पाहता येईल. भारतात कलगडाची शेती उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. भारतात एकूण कलगड उत्पादन सुमारे २,४९५ हजार टन आहे. कलिंगडात सुमारे ९२ टक्के पाणी असल्यामुळे ते शरीराला थंड ठेवते आणि पाण्याची कमतरता दूर करते. याशिवाय, कलगडात अनेक जीवनसत्त्वे आणि पोषक घटक असतात, जे आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात.

**भारतात कोणत्या राज्यात जास्त उत्पादन?**


उत्तर प्रदेश हे भारतात सर्वात जास्त कलिंगडाचे उत्पादन घेणारे राज्य आहे. येथील सुपीक जमीन आणि हवामान कलिंगड पिकवण्यासाठी खूप अनुकूल आहे. २०२१-२२ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये १६.८६ हजार हेक्टर जमिनीवर कलिंगडाची शेती झाली होती, जे भारतातील एकूण उत्पादनाचा सर्वात मोठा भाग होते. २०२४ मध्येही उत्तर प्रदेशातच कलिंगडाची सर्वाधिक शेती झाली.

# आवाजाचे नोट्समध्ये रूपांतर करणारे मशीन

केरळच्या अभियांत्रिकीच्या काही विद्यार्थ्यांनी एक मशीन बनवले आहे. ते आवाज ऐकते आणि ते हस्तलिखित नोट्समध्ये रूपांतरित करते. हे आश्चर्यकारक मशीन लिहिता येत नसणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल. सोशल मीडियावर या शोधाची खूप चर्चा होत आहे. केरळच्या विद्यार्थ्यांनी 'एआय' मशीन मॉडेल बनवले आहे. अभियांत्रिकीचा अभ्यास करणारा विद्यार्थी अजय एच. आणि त्याच्या टीमने एक अनोखे मशीन बनवले आहे. या मशीनचे नाव 'टॉक टू राइट' आहे. तुम्हाला फक्त बोलायचे आहे आणि मशीन तुमचे बोललेले शब्द कागदावर लिहिते. हे मशीन नुकतेच 'एन्टे केरलम एक्स्पो' नावाच्या एका मोठ्या सरकारी कार्यक्रमात दाखवण्यात आले.

अजयच्या म्हणण्यानुसार हे मशीन बोललेले शब्द जसे आपण हाताने लिहितो तसेच लिहिते. मशीनला एक मायक्रोफोन जोडलेला असतो. समोरची व्यक्ती बोलल्यानंतर ऐकून घेणारे मशीन हळूहळू ए-४ कागदावर त्याच्या पेनने लिहिते. तेही अगदी सुबक अक्षरात, ओळीमध्ये. फक्त बोलून, ते कागदावर आज्ञा लिहिते. हे मशीन बनवण्यासाठी रास्पबेरी पाई, आर्डिनो (जीआरबीएल) आणि पायथॉन नावाच्या तंत्रज्ञानाचा वापर केला गेला आहे. या सर्व तंत्रज्ञानाचा वापर संगणक, रोबोट आणि प्रोग्रामगमध्ये केला जातो; परंतु अजय आणि त्याच्या टीमने त्यांचा वापर डिजिटल स्क्रिब (म्हणजे तुमच्या वतीने लिहू शकणारा सहाय्यक) बनवण्यासाठी केला आहे. याचा सर्वात मोठा फायदा शारीरिकदृष्टया कमकुवत लोकांना होईल. हाताने लिहू न शकणारे कवा बोलून काम करू इच्छिणाऱ्यांना हे तंत्र कुठेही उपयुक्त ठरू शकते, मग ते शाळा, ऑफिस कवा घर असो..

## कॅलिडोस्कोप




# स्वतः बॅटरी बदलणारा रोबो

कल्पना करा, तुमचा मोबाईल स्वतः चार्जिंग स्टेशनवर जाऊन त्याची बॅटरी काढून नवीन बॅटरी लावत असेल तर... तर तुम्हाला कसे वाटेल? आता एका रोबोटनेही असेच काम केले आहे. रोबो बनवणाऱ्या चीनच्या प्रसिद्ध यूबी टेक रोबोटिक्स कंपनीने वॉकर एस२ नावाचा मानवासारखा भासणारा रोबो बनवला आहे. या रोबोने असा जुगाड बनवला आहे, की आता त्याला थांबून चार्ज करण्याचीही गरज नाही. बॅटरी कमी होते, तेव्हा तो स्वतः बॅटरी बदलणाऱ्या स्टेशनवर जातो आणि त्याची एक बॅटरी काढून चार्जिंगवर ठेवतो आणि दुसरी पूर्ण चार्ज असलेली बॅटरी लावतो. नंतर तो न थांबता पुन्हा कामाला लागतो. हे अद्भुत तंत्रज्ञान दुहेरी बॅटरी सिस्टीमवर काम करते. म्हणजे त्यात दोन बॅटरी आहेत. ही सिस्टिम एका बॅटरीसह काम करते आणि तुम्हाला हवे तेव्हा दुसरी बदलू शकते. यामुळे ती कधीही बंद करावी लागत नाही. चार्जिंगचा त्रास नाही, व्यत्यय येत नाही. एक बॅटरी संपू लागते, तेव्हा रोबो काय करायचे ते समजून घेतो. जणू एखाद्या माणसाला भूक लागली आहे आणि तो कोणालाही न सांगता स्वतः जाऊन अन्न खातो. तशीच या रोबोटची बॅटरी बदलण्याची संपूर्ण प्रक्रिया खूप सोपी आणि मजेदार आहे. वॉकर एस२ त्याच्या हातांनी मागच्या बाजूला जोडलेली बॅटरी काढून शेल्फमध्ये ठेवतो आणि तिथून एक नवी बॅटरी काढून आत घालतो. हे काम करण्यासाठी त्याला फक्त काही मिनिटे लागतात. त्याला कोणत्याही मदतीची आवश्यकता पडत नाही कवा कोणत्याही सूचनांची आवश्यकता रहात नाही. तो हे सर्व स्वतः करतो. ही



प्रणाली चीनमधील काही इलेक्ट्रिक कारसारखी आहे, जिथे बॅटरी चार्ज करण्याऐवजी थेट त्या बदलल्या जातात. सोशल मीडिया वापरकर्ते त्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया देत आहे. एका वापरकर्त्याने लिहिले, 'मानव स्वतः श्वास घेऊ शकतात आणि खाऊ शकतात, रोबो ही आता नवी गोष्ट राहिलेली नाही.' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, 'रोबो एके दिवशी सर्व मानवांना खातील. दुसऱ्या एका वापरकर्त्याने लिहिले, एक दिवस जगात फक्त रोबो असतील आणि माणूस पुस्तकांमध्ये अस्तित्वात असेल.

# ये दोस्ती...

युरोपमधल्या पर्वतरांगांमध्ये आढळणारा मेर्मोट हा प्राणी लाजराबुजरा आहे. मेर्मोट माणसांजवळ जात नाही. तो बिळामध्ये राहतो. माणसं जवळ आली की लगेच बिळात निघून जातो. मेर्मोट खूप चपळ असतो. शेकरू कवा खारीसारखा दिसणारा मेर्मोट खूप गोंडस असतो. ऑस्ट्रियाचा मेटियो वॉच या मेर्मोटचा मित्र आहे. प्राणी आणि माणसाच्या मैत्रीच्या बऱ्याच कथा आपण ऐकल्या आहेत. मेर्मोट आणि मेटियो यांची मैत्रीही अशीच अनोखी आहे. गेल्या अकरा वर्षांपासून मेर्मोट आणि मेटियो यांच्यात मैत्रीचे बंध जुळले आहेत. मेटियो दरवर्षी या मेर्मोटना भेटायला येतो. मेटियो आल्यावर मेर्मोट खूप खूश होतात. १४ वर्षांचा मेटियो इन्सब्रूकला राहतो. २०१२ मध्ये मेटियो आणि मेर्मोटमधली ही मैत्री चर्चेचा विषय ठरली होती. मेर्मोट आणि मेटियो यांच्यात मैत्री नेमकी कशी झाली हे कोणालाही माहीत नाही. पण हे मेर्मोट मेटियोला अजिबात घाबरत नाहीत. उलट, त्याच्यासोबत खेळतात. मेटियोची आई मेर्मोट आणि मेटियोचे फोटोही काढते. मेटियोची अगदी लहानपणीच मेर्मोटशी मैत्री झाली होती.





# त्या शिकवतात वाहतुकीचे नियम

लोकांनी वाहतुकीचे नियम पाळले तर अपघात बऱ्याच अंशी कमी होऊ शकतात, अनेकांचे जीव वाचू शकतात. वाहतूक पोलिसांकडून नागरिकांना वेळोवेळी सूचना दिल्या जातात. जागरूकता मोहिमा राबवल्या जातात. पण नागरिकांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. म्हणूनच इंदूरमधल्या वृंदा नावाच्या महिलेने ही जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेतली. ५८ वर्षांच्या वृंदाताई दररोज संध्याकाळी चार ते सहा या वेळेत वाहतूक पोलिसाच्या भूमिकेत असतात. नव्या वर्षात लोकांना वाहतुकीच्या नियमांप्रती जागरूक करण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे. त्या तासभर विजयनगर चौकात आणि तासभर सयाजी चौकात हा उपक्रम राबवतात. वाहनांना थांबवून वाहतुकीच्या नियमांबाबत सजग करतात. म्हणूनच वृंदा या भागात बऱ्याच लोकप्रिय झाल्या आहेत. इंदूरला स्वच्छतेच्या बाबतीत पहिला क्रमांक मिळाला आहे. मात्र आता वाहतुकीच्या नियमांबाबतही शहराला पहिला क्रमांक मिळायला हवा, असं त्यांना वाटतं. म्हणूनच त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

# २२ वर्षे मेकअप! चेहराच बनला भीतीदायक

मेकअप करायला कोणाला नाही आवडत?, छान दिसण्यासाठी, चेहऱ्याला उठाव देण्यासाठी, सौंदर्य वाढवण्यासाठी मेकअप करायला बहुतांश लोकांना आवडते; पण मेकअप केल्यानंतर, दिवसाअखेर कवा झोपायला जाण्यापूर्वी मेकअप काढून चेहरा स्वच्छ धुणे गरजेचे असते. अनेक सौंदर्यतज्ज्ञही हाच सल्ला देतात; मात्र मेकअप काढून चेहरा नीट धुतला नाही तर काय होऊ शकते याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? चीनमधील गाओ या महिलेने कधीही विचार केला नव्हता की तिच्यासोबत असे काहीतरी वाईट घडेल. ती वीस वर्षे दररोज मेकअप करत होती; पण तो काढणे कवा उतरवणे, चेहरा धुणे याची तिला झंझट, कटकट वाटायची. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा मेकअप लावावा लागणारच असेल, तर रात्री तो का धुवावा, असा विचार ती करायची; पण त्याचा परिणाम खूप भयानक झाला. आता तिच्या चेहऱ्याची अवस्था इतकी वाईट झाली आहे, एवढी



ॲलर्जी झाली की तिला ओळखणेच शक्य नाही. चेहरा एवढा सुजला, की साधे घाराबेहर पडण्याचीदेखील तिला भीती वाटू लागली. चीनमधील या महिलेचे नाव गाओ असे आहे. तिने स्वानुभवातून आता 'सोशल मीडिया'वर सर्वांना इशारा दिला आहे. मेकअप केल्यानंतर तो नीट काढणे, मेकअप उतरवणे, चेहरा व्यवस्थित धुणेही खूप महत्वाचे आहे. तिने स्वतः २० वर्षे मेकअप केला; पण कधीही तिचा चेहरा व्यवस्थित स्वच्छ केला नाही. ती चेहरा फक्त पाण्याने धुवायची आणि सकाळी चेहऱ्यावर पुन्हा मेकअप थापायची. सुरुवातीला सगळे व्यवस्थित चालले होते; पण या वर्षी इतकी ॲलर्जी झाली, की तिचा चेहरा पूर्णपणे सुजला. इतके की, तिला ओळखणेही कठीण झाले. असे वाटले की हजारो मुंग्या चेहऱ्यावर धावत आहेत. तिला प्रचंड खाज सुटते, तिचा चेहरा सुरकुत्याने भरलेला आहे आणि भीतीमुळे तिने लोकांना भेटणेही बंद केले आहे. सुरुवातीला, तिने डॉक्टरांकडे जाण्याऐवजी स्किन क्लिनिकमध्ये जाऊन इंजेक्शन घेतले; पण त्यामुळे तिची प्रकृती आणखी बिकट झाली. या अनुभवावरून धडा घेऊन गाओ आता सर्वांना समजावून सांगते, की कोणताही मेकअप करा; पण झोपण्यापूर्वी चेहरा व्यवस्थित स्वच्छ करणे आवश्यक आहे. फक्त पाण्यानेच नाही, तर चांगल्या फेसवॉशने. अन्यथा चेहरा सुंदर नाही, तर भयानकही बनू शकतो असा इशारा तिने दिला.



# ट्रेडमिलचा देशी जुगाड!

आता तुम्हाला ट्रेडमिलवर धावण्यासाठी जिम फी भरण्याची गरज नाही, ना तुम्हाला वीज बिलाची काळजी करण्याची गरज आहे, ना मोटार बिघाडाची भीती. कारण देशी मनाने असा जुगाड केला आहे, की तो पाहून परदेशी मशीन्सनाही लाज वाटेल. आता एक चित्र बघा. गावाच्या एका कोपऱ्यात एक ट्रेडमिल उभी आहे; पण ती सामान्य नाही, ती पूर्णपणे देशी आहे. ती बॅटरीवर ना बॅटरीवर चालते, ना करंटवर. तिला चमकदार स्क्रीन नाही; मात्र त्यात चिखल, निसरडा, जलद वाहणारा नळ आणि स्टँड आहे. गावातील रस्त्यांवर बनवलेल्या या अनोख्या ट्रेडमिलला कोणताही बेल्ट नाही. त्याऐवजी एक छोटा स्टील स्टँड आहे, जो जमिनीत गाडलेला आहे. ती व्यक्ती तो स्टँड धरते. त्याच्या खाली ओली, चिकट, निसरडी कच्ची माती पसरली आहे. जेव्हा एखादी व्यक्ती तिथे उभी राहून पाय हलवू लागते, तेव्हा पुढे सरकत नाही; पण त्याच्या पायांचा व्यायाम होतो. शहरातील लोक जिथे विचार करून थकतात, तिथे गावकरी विचार करतात. सर्वात खास गोष्ट म्हणजे त्यात बसवलेला पाण्याचा नळ. स्टँडच्या एका कोपऱ्यात बसवलेला हा नळ उच्च दाबाने पाणी सोडतो. त्यामुळे माती सतत ओली राहते. आणि जेव्हा माती ओली असते, तेव्हा घसरण वाढते. जेव्हा घसरण वाढते, तेव्हा शर्यतदेखील त्यानुसार वेगवान दिसते. परिणामी माणूस त्याच ठिकाणी राहतो आणि स्वतःला थकवतो.



# मंगळ मोहिमेसाठी विनोदवीर

सध्या मंगळ ग्रहाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. भारतानेही मंगळयान मोहीम राबवली आहे. चंद्रानंतर आता मंगळ ग्रहावर जीवसृष्टीचा शोध घेतला जात आहे. मात्र पृथ्वीवरून मंगळावर जाणं खूप कठीण आहे. चंद्र पृथ्वीपासून जवळ आहे. पण मंगळाचं तसं नाही. नासा या अमेरिकेतल्या अंतराळ संशोधक संस्थेने मंगळ मोहिमेच्या अडचणींची एक यादी तयार केली. त्यात पृथ्वी आणि मंगळ ग्रहामधलं अंतर, तिथलं वातावरण अशा काही बाबींचा समावेश होता. मंगळ ग्रहावर मोठ्या प्रमाणावर किरणोत्सर्ग होतो. मंगळाचं कोणतंही चुंबकीय क्षेत्र नसल्यामुळे या किरणोत्सर्गाचं प्रमाण बरंच जास्त आहे. या किरणांकडे माणूस उघड्या डोळ्यांनी बघू शकत नाही. त्यांच्यामुळे मोतीबदू तसंच डोळ्यांच्या कॅन्सरचा धोका वाढतो. पृथ्वीपासून मंगळ ग्रह जवळपास १४ कोटी मैल आहे. चंद्रावर जाण्यासाठी अंतराळवीरांना तीन दिवस प्रवास करावा लागतो. पण मंगळापर्यंत पोहोचण्यासाठी काही महिने लागू शकतात. एवढा वेळ अंतराळात घालवणं हे मोठं आव्हान असू शकतं. कितीही प्रशिक्षण दिलं तरी अंतराळवीरांना काही काळानंतर अडचणी येऊ लागतात. म्हणूनच मंगळावर माणूस पाठवण्याच्या मोहिमेसाठी नासा विनोदवीरांचा शोध घेते आहे! यामुळे म्हणे अंतराळवीर तणावमुक्त राहू शकतील...






# कॅटलिनचं चालतं फिरतं घर

स्कॉटलंडमधल्या एका विद्यार्थिनीने घरभाड्याला कंटाळून चालतंफिरतं घर बनवून टाकलं. तिच्या या कल्पनेचं सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. २५ वर्षांची कॅटलिन मॉ विद्यार्थिनी आहे. स्कॉटलंडमधल्या एका घरात राहण्यासाठी ती महिल्याला २५० पाउंड भाडं देत होती. २५० पाउंड म्हणजे जवळपास २३,४०३ रुपये. घराचं भाडं सतत वाढत होतं. घरभाडं, वीजबिल तसंच इतर खर्चांमुळे कॅटलिनचं दिवाळं निघत होतं. मग तिने एक शक्कल लढवली. कॅटलिनने एक व्हॅन विकत घेतली आणि आता या व्हॅनलाच ती घराचा लूक देते आहे. तिने ३५ वर्षांपूर्वीची एक व्हॅन तीन हजार पाउंडांना विकत घेतली. या व्हॅनमध्ये बदल करून घरासारखं सजवण्याचा तिचा प्रयत्न आहे.

घरभाडं म्हणून महिन्याला २५० पाउंड देण्यापेक्षा एका व्हॅनचं घरात रुपांतर करून त्यात राहणं तिला योग्य वाटतं. कॉलेज आणि इतर कारणांसाठी कॅटलिन बराच काळ घराबाहेर असते. फक्त रात्री झोपण्यासाठी घरात यायचं आणि त्यासाठी २५० पाउंड खर्च करायचे हे तिला योग्य वाटत नव्हतं. म्हणूनच तिने ही कल्पना लढवली. आता ती या व्हॅनमध्ये छोटं स्वयंपाकघरही बसवणार आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या व्हॅनमधूनच ती युरोपची भ्रमंती करणार आहे. कॅटलिनची ही शक्कल भन्नाटच म्हटली पाहिजे.



# सेंसेक्समध्ये 329 अंकांची उसळी
## आयटी सेक्टरमध्ये जबरदस्त वाढ

**सेन्सेक्स 81,635**
**निफ्टी 24,967**

मुंबई, दि. २५ प्रतिनिधी

सोमवारी शेअर मार्केट तेजीने बंद झाला. दोन्ही बेंचमार्क इंडेक्स हिरव्या चिन्हावर बंद झाले. एका बाजूला सेंसेक्समध्ये ३२९ अंकांची उसळी दिसली, तर निफ्टी ५० मध्ये ९८ अंकांची उसळी झाली.

सोमवारी सकाळी सेंसेक्सने ८१,५०१ च्या पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाअखेर ०.४० टक्क्यांच्या वाढीसह ८१,६३५ च्या पातळीवर क्लोजिंग झाली. सोमवारी सकाळी निफ्टी ५० ने २४,९४९ च्या पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाअखेर ०.३९ टक्क्यांच्या वाढीसह २४,९६७ च्या पातळीवर बंद झाला. बेंचमार्क इंडेक्ससोबतच, बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप इंडेक्सचे प्रदर्शन कमकुवत राहिले. बीएसई मिडकॅप इंडेक्स ०.१० टक्क्यांनी वाढला, तर स्मॉलकॅप इंडेक्स ०.०२ टक्क्यांनी घसरला.

या काळात, बीएसईवर लिस्टेड कंपन्यांचे मार्केट कॅप मागील सत्रातील ४५३.६५ लाख कोटी रुपयांवरून वाढून ४५५ लाख कोटी रुपये झाले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एका सत्रात १ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक फायदा आयटी सेक्टरमधील इन्फोसिसला झाला, ज्यात ३ टक्क्यांपर्यंत वाढ दिसली. त्यानंतर आयटी सेक्टरमधील दुसरी कंपनी टीसीएस २.८४ टक्क्यांनी वाढली, एचसीएल टेक २.५९ टक्क्यांनी वाढला, विप्रो २.१० टक्क्यांनी वाढला आणि हिंडाल्को १.६६ टक्क्यांनी वाढला.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक तोटा अदानी एंटरप्रायझेसला झाला, ज्यात ०.९५ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर अपोलो हॉस्पिटल्स ०.९१ टक्क्यांनी घसरले, नेस्ले इंडिया ०.८६ टक्क्यांनी घसरले, भारत इलेक्ट्रॉनिक्स ०.७५ टक्क्यांनी घसरले आणि एसबीआय लाइफ ०.६६ टक्क्यांनी घसरले.


सेक्टोरल इंडेक्समध्ये सर्वाधिक वाढ आयटी सेक्टरमध्ये दिसली, ज्यामुळे निफ्टी आयटी २.३७ टक्क्यांच्या वाढीसह बंद झाला. त्यानंतर, निफ्टी रिअल्टी ०.७५ टक्क्यांनी वाढला, निफ्टी मेटल ०.६५ टक्क्यांनी वाढला, निफ्टी फार्मा ०.४४ टक्क्यांनी वाढला, निफ्टी सर्व्हिसेस सेक्टर ०.४४ टक्क्यांनी वाढला.

सर्वाधिक तोटा निफ्टी मीडियाला झाला, ज्यामुळे तो १.६७ टक्क्यांच्या घसरणीसह बंद झाला. त्यानंतर, निफ्टी कॅपिटल मार्केट ०.६५ टक्क्यांनी घसरला, निफ्टी इंडिया डिफेन्स ०.२९ टक्क्यांनी घसरला, निफ्टी पीएसयू बँक ०.२५ टक्क्यांनी घसरला, निफ्टी एफएमसीजी ०.१० टक्क्यांनी घसरला.




**चिंचपोकळी दक्षिण विभाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ म्हणजेच गिरणगावचा राजा आणि हॉट लाईन स्पेस आर्ट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बालकला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात मुलांना शाडूच्या मातीच्या गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरात १२८ मुलांनी सहभाग घेतला. या वेळी मंडळाचे अध्यक्ष संदीप मुळम, सचिव आकाश कोते, खजिनदार अतीश लांडगे, अमर कानगुडे आणि मंडळाचे पदाधिकारी तसेच डॉट लाईन स्पेस गौरमोनी दास, शिबीर प्रमुख मिलिंद भुर्के, शिवम कांबळे आणि निकम सर उपस्थित होते.**

# अथर्व सुदामेच्या समर्थनार्थ असीम सरोदे यांची पोस्ट



मुंबई, दि. २५ प्रतिनिधी

प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर अथर्व सुदामे एका रीलवरून वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. सध्या त्याच्यावर चोहीकडून टीकेची झोड उठवली जात आहे. पण, दुसरीकडे अथर्व सुदामेच्या समर्थनातही काहीजण पोस्ट करत आहेत. अशातच अथर्व सुदामेला ब्राम्हण महासंघानं फैलावर घेतले असतानाच आता नामांकीत वकील असिम सरोदे यांनी अथर्व सुदामेच्या समर्थनार्थ पोस्ट केली आहे. आपल्या पोस्टमधून असिम सरोदे यांनी अथर्व सुदामेनं व्हिडीओ डिलीट केल्या, ते योग्य केलं नाही, असंही म्हटलं आहे. तसेच, अथर्वने तो व्हिडिओ पुन्हा अपलोड करावा. कोण काय करतंय ते बघूयात, असं म्हणत अथर्वला पाठींबा दिला आहे.

# आम्ही धर्माच्या आधारावर हत्या नाही केली - राजनाथ सिंह

जोधपूर, दि. २५ वृत्तसंस्था

देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सोमवारी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत महत्त्वाचे विधान केले आहे. एप्रिलमध्ये झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यात लोकांना त्यांचा धर्म विचारून त्यांची हत्या करण्यात आली, आपल्या सैनिकांनी दहशतवाद्यांना धर्माच्या आधारावर नाही तर त्यांच्या कर्माच्या आधारावर ठार केले, असे राजनाथ सिंह म्हणाले आहेत.

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ जणांची हत्या केली होती, यानंतर भारताना ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये हल्ले करत जोरदार प्रत्युत्तर दिले होते. राजस्थानच्या जोधपूर येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना संरक्षणमंत्र्यांनी यासंबंधीत विधान केले. भारत 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेवर विश्वास ठेवतो आणि जाती किंवा धर्माच्या आधारावर भेदभाव करत नाही, असेही



राजनाथ सिंह म्हणाले.

"आपल्या लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' मधून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आणि या कारवाईमध्ये निश्चित करण्यात आलेल्या लक्ष्यांवर अचूक हल्ले केले गेले." पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी संघटनांशी संबंधित अनेक तळांवर हे हल्ले करण्यात आले, असेही ते पुढे बोलताना म्हणाले. सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान आणि डिफेन्स आणि स्पोर्ट अकादमीच्या उद्घाटनासाठी राजनाथ सिंह हे जोधपूर येथे आले होते.

काही दिवसांपूर्वीच एनसीईआरटीने (राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद) त्यांच्या अभ्यासक्रमात 'ऑपरेशन सिंदूर'चा समावेश केला आहे. ऑपरेशन सिंदूरचं लष्करी व तांत्रिक यश आणि त्यातून दिलेला राजकीय संदेश या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना शिकवल्या जाणार आहेत. एनसीईआरटीने दोन अभ्यासक्रम जारी केले आहेत. त्याअंतर्गत इयत्ता तिसरी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर भारतीय लष्कराने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर या मोहिमेबाबतची माहिती दिली जाणार आहे.

या अभ्यासक्रमात म्हटलं आहे की, पाकिस्तानने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात त्यांचा सहभाग नसल्याचा दावा केला असला तरी हा हल्ला थेट त्यांच्या लष्करातील अधिकारी व राजकीय नेतृत्वाच्या आदेशानेच झाला होता. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून शत्रूला चोख प्रत्युत्तर दिलं. परंतु, ही केवळ एक लष्करी कारवाई नव्हती. शांततेसाठी व स्वसंरक्षणासाठी उचललेलं पाऊल होतं. ही मोहीम भारतासाठी सन्मान व दृढनिश्चयाचं प्रतीक आहे.

# लाडकी बहिणीमध्ये कोणत्या निकषाने अर्ज रद्द केले ते सांगा- सुप्रिया सुळे

इंदापूर, दि. २५ प्रतिनिधी

लाडक्या बहिणी बोगस तसेच अनेक ठिकाणी घोटाळे केले जात आहेत. लाडकी बहिणीमध्ये काय निकष लावून अर्ज भरले आणि काय निकषाने रद्द केले, याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल, असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.



इंदापूरमध्ये माध्यमांशी बोलताना खा. सुळे म्हणाल्या, ४ हजार ८०० कोटी रुपयांमध्ये काय-काय झालं असतं. सरसकट कर्जमाफीला याचा किती आधार मिळाला असता.

त्यामुळे याची चौकशी झाली पाहिजे. सरकारने याची पारदर्शक चौकशी करावी. योजना बंद करून प्रश्न सुटत नाहीत, त्यामध्ये सुधारणा केल्या पाहिजेत. लाडक्या बहिणी तुमच्या खरंच लाडक्या असतील तर निवडणुकीनंतर देखील तुमच्या बहिणी लाडक्या असायलाच हव्यात. बहिणीसाठी सुधारणा करणे हे सरकारचा जो भाऊ आहे, त्याचे कर्तव्य नाही का? असा सवाल त्यांनी सरकारला विचारला.

राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांनी संघ कार्यक्रमाला उपस्थिती लावली. यावर खा. सुनेत्रा पवार यांनी कुठे जायचं आणि कुठे नाही हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. त्या कार्यक्रमाला मलादेखील कंगना रणावत यांनी बोलावलं होतं. त्यांना विनंती केली हा संघाचा इनरोल मेनचा कार्यक्रम आहे. सभासद नोंदीच्या कार्यक्रमाला मला कंगना रणावत यांनी बोलवलं होतं. माझे आणि कंगनाजींचे वैयक्तिक संबंध चांगले आहेत, पण विचार वेगळे असल्याचे खा. सुळे यांनी स्पष्ट केले.

हे सरकार घोषणाबाज आणि घोटाळेबाज सरकार आहे. जे सरकार २६ लाख बहिणींना धोका देऊ शकतो तर 'टोल क्या चीज है' असेदेखील त्या म्हणाल्या. राज्यात अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे, हे केंद्र सरकारचा डेटा सांगतो. केंद्रात आणि राज्यात दोन्हीकडे त्यांचे सरकार आहे. राज्यात अतिवृष्टी झाली आहे. मुख्यमंत्री आणि केंद्राचे सहकारमंत्री अमित शहा यांची मागील आठवड्यात भेट घेतली. महाराष्ट्रात ओला दुष्काळ आहे, त्यासाठी मदत करावी, अशी विनंती केली. महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याची सरसकट कर्जमाफी करावी, अशी मागणी खा. सुळे यांनी या वेळी केली.

# येमेनच्या राजधानीत हुथी बंडखोरांवर इस्रायली हवाई हल्ले



कैरो, दि. २५ वृत्तसंस्था

येमेनची राजधानी सना शहरावर रविवारी स्थानिक वेळेनुसार पहाटे इस्रायली हवाई हल्ले झाले. स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, इस्रायलचा हा हल्ला इस्रायलवर क्लस्टर बॉम्ब टाकल्यानंतर काही दिवसांनीच झाला आहे. १७ ऑगस्टनंतर बंडखोरांच्या ताब्यात असलेल्या सना येथे हा पहिला हल्ला आहे. इस्रायलने त्यावेळी म्हटलं होतं की, या हल्ल्यांमध्ये ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य करण्यात आलं होतं, जे बंडखोर वापरत असल्याचे मानले जाते. इस्रायलने रविवारच्या हल्ल्याची पुष्टी केली नाही. इस्रायलने २२ महिन्यांहून अधिक काळ क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले आहेत आणि लाल समुद्रातील जहाजांना लक्ष्य केले आहे.

# सर्पदंश प्रथमोपचार आणि उपचार

**आपला देश हा निसर्गसंपन्न असा देश आहे. अर्थात अनेक प्रकारच्या वन्यजीवांची,पशुपक्षांची आणि सरीसृप वर्गातील प्राण्यांची तितकीच विविधता असलेला असा आपला देश आहे. याच समृद्धतेतील सरीसृप वर्गातील प्राणी साप,किंवा नाग,घोणस,फुरसे या प्राण्यांची फक्त नाव घेतली तरी अंगावर शहारे उमटतात. कारण साप म्हटल कि मृत्युच अशी जनमानसात असलेली प्रचंड भीती. पावसाळ्याच्या सुमारास विशेषतः ग्रामीण भागात याच सरपटणाऱ्या सापांचा, मुक्त संचार सुरु असतो. त्यामुळेच याच सापांचा अपघाताने मानवाला दंश होतो आणि मृत्यूशी झुंज द्यावी लागते. मुळात सर्पदंश आणि औषधोपचार याविषयी जनमानसात प्रचंड समाज गैरसमज प्रचलित आहेत. त्यातच मनात प्रचंड भीती असल्यामुळे सर्पदंश झाल्यानंतर तातडीने उपचार सुरु करण्याऐवजी अनेक लोक घरगुती किंवा मांत्रिक उपचारांचा आधार घेतात आणि रुग्ण दगावतो. म्हणूनच सर्पदंश झालेल्या रुग्णाला अगदी प्राथमिक उपचार कोणते द्यावेत? साप चावल्यानंतरची लक्षण कोणती?आणि त्यावर नेमकी उपचार पद्धती काय आहे? याच प्रश्नांचा वेध घेण्यासाठी सुप्रसिद्ध सर्पदंश विकार तज्ज्ञ डॉकटर सदानंद राऊत यांच्याशी साधलेला संवाद.**

**हॅलो डॉक्टर**

**लोकारोग्य**

१] सर्पदंशामुळे जागतिक स्तरावर आणि आपल्या देशात दरवर्षी मृत्युमुखी पडणाऱ्याची सद्यस्थिती नेमकी काय आहे?

संपूर्ण जगाचा विचार केला तर दरवर्षी जगभरात साडेपाच ते सहा लाख लोकांना सर्पदंश होतो.त्यापैकी उपचारांअभावी १ लाख लोक मृत्युमुखी पडतात तर उर्वरित चार लाख लोकांना कायममचे अपंगत्व येते किंवा ते रुग्ण मानसिक आजारी बनतात. आपल्या भारतात दरवर्षी अडीच ते ३ लाख लोकांना दरवर्षी सर्पदंश होतो त्यापैकी ४० ते ५० लाख लोकांचा मृत्यू ओढवतो. आणि उर्वरित लोक कायमचे अपंग बनतात किंवा मानसिक आजाराने ग्रासतात . मागील वर्षी आपल्या महाराष्ट्रातच ३३ हजार लोकांना सर्पदंश झाला होता. विशेष म्हणजे जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार जितके मृत्यू हे सर्पदंशाने होतात त्या आकडेवारीपेक्षा कितीतरी अधिक मृत्यू हे झालेले असतात ज्याची नोंद होत नाही. आपल्या देशात दरवर्षी साधारण १ लाख लोक एड्स सारख्या भयन्कर आजाराने मरतात तर यापैकी निम्मे म्हणजे ५० हजार लोक हे केवळ सर्पदंशाने मरतात इतके प्रमाण मोठे आहे.

2] आपल्याकडे सापांच्या विविध जाती आहेत परंतु त्यापैकी विषारी साप आणि बिनविषारी साप किती आहेत ?

सापांच्या जाती आहेत त्यापैकी आपल्या देशात २७२ जातीचे साप आढळतात. या २७२ जातींच्या सापांमध्ये केवळ ५२ जाती या विषारी सापाच्या आहेत. आपल्या देशात प्रामुख्याने ४ विषारी जातीचे साप आढळतात. नाग आणि मण्यार हे साप चावले कि ते मनुष्याच्या मज्जा संस्थेवर दुष्परिणाम करतात. आणि घोणस किंवा फुरसे या जातीचे विषारी साप चावले कि ते रक्ताभिसरण प्रक्रियेवर दुष्परिणाम करून रक्त अक्षरशः गोठवतात. शिवाय पश्चिम महाराष्ट्रात बांबूपित व्हायपर नावाचे साप देखील आढळतात जे बिनविषारी आहेत.

३]विषारी साप चावल्यानंतरची लक्षण नेमकी कोणती असतात?

नाग किंवा मण्यार सारखा अत्यंत जहरी साप चावला तर माणसाचा अगदी २ तासात मृत्यू होतो. मज्जासंस्थेत विष झपाट्याने पसरल्याने मनुष्याला चक्कर येते,बोलणं तोतर होत,थुंकी गिळण्यास खूप त्रास होतो,दम लागतो,रक्तातील ऑक्सिजन कमी होत जातो आणि मनुष्य मृत्युमुखी पडू शकतो.तर मण्यार चावला तर लक्षण थोडी उशिरा जाणवतात. मण्यारचे दात छोटे असल्यामुळे चावल्यानंतर जाणवत नाही. वेदना किंवा सूज देखील येत नाही. आणि लक्षण ३ ते ४ तासानंतर जाणवायला सुरवात होते. माणसाचे सांधे दुखतात,शरीर



लकवा मारल्याप्रमाणे स्तब्ध होते आणि कालांतराने मनुष्य बेशुद्ध होतो.घोणस किंवा फुरसे हे हिमोटॉक्सिस सर्प आहेत. हे सर्प चावले कि तीव्र सूज येते वेदना होतात.अंगावर बारीक फोड देखील येतात. रक्त गोठण्याची प्रक्रिया थंडावते आणि माणसाला हृदयविकाराचा झटका देखील येऊ शकतो. तर घोणस चावला कि माणसाच्या हिरड्यांमधून रक्तस्त्राव होतो पोट खूप दुखत,मेंदूमध्ये रक्तस्त्राव होतो अनेकदा माणसाची लघवी देखील बंद होते आणि दोन्ही किडनी निकामी होतात अशा रुग्णाला हिमोडायलिसिस ची गरज भासते.

४] कोणत्याही सापाने दंश केल्यानंतर मनुष्य संभ्रमावस्थेत असतो. अशावेळी प्रथमोपचार नेमके काय करायचे?

सर्प चावल्यानंतर सापाचे विष संपूर्ण शरीरात पसरू नये हि भीती असते त्यामुळेच रुग्णाला अगोदर मोकळ्या हवेत झोपू दयावे. सर्पदंश झालेल्या रुग्णाला सातत्याने धीर द्यायला हवा. अशा रुग्णाला हालचाल करू देऊ नये किंवा श्रम करायला लावू नये. कारण हालचाल केल्याने किंवा धावपळ केल्याने रक्ताभिसरण प्रक्रिया जलद होऊन मेंदूपर्यंत विष पसरण्याची भीती असते. सर्पदंश झालेल्या जागेवर दोरीने घट्ट बांधणे,ब्लेडने कापणे,किंवा तंत्र मंत्र असे अघोरी आणि खोटे उपचार अजिबात करू नयेत.साप चावल्यानांतर वेळ न दवडता रुग्णाला ताबडतोप हॉस्पिटल मध्ये हलवावे आणि उपलब्ध लस द्यावी

५] सर्पदंश झालेल्या रुग्णाला रुग्णालयात आणल्यानंतर रक्ताच्या तपासण्या झाल्यानंतर उपचार नेमके काय केले जातात?

रुग्णदंश झालेल्या रुग्णाला जर वेळेवर रुग्णालयात दाखल केले गेले नाही तर ताबडतोप मृत्यू होऊ शकतो त्यामुळेच सर्पदंश झालेल्या रुग्णाची स्थिती हि गंभीर असते आणि त्याच्यावर उपचार करणे हे देखील तितकेच जिकरीचे आणि आव्हानात्मक असते. रुग्णाला रुग्णालयात दाखल करताच त्याच्यावर एकाच वेळी उपचाराला सुरवात करताना त्याचा रक्त दाब नियंत्रित ठेवण्यासाठी प्रयत्न केले जातात शिवाय ऑक्सिजन ची लेव्हल कमी होऊ नये म्हणूनत्याला कृत्रिम ऑक्सिजन द्यावा लागतो. त्याला सलाईन देखील लावले जाते आणि टायचा रक्तपुरवठा सुरळीत कसा होईल हे पहिले जाते. रुग्णाची हृदय प्रक्रिया बंद पडू नये म्हणू ताबडतोप सीपीआर चाचणी करावी लागते. आणि प्रसंगी त्याला व्हेंटिलेटर वर ठेवायला लागते . सर्पदंशावर लस देखील उपलब्ध आहे ती काही तासांच्या आत रुग्णाला द्यावी लागते. अनेकदा या लसीचे प्रमाण चुकले तर त्याचे दुष्परिणाम देखील होऊ नयेत हे पाहिले जाते.

# ईडीने छापा टाकला, आमदार भिंतीवरून उडी मारून पळून गेले फोनही नाल्यात फेकला; अधिकाऱ्यांनी केली अटक

मुर्शिदाबाद, दि. २५ वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमधील शाळांमध्ये शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या भरतीतील कथित अनियमिततेच्या चौकशीच्या संदर्भात ईडीने छापे टाकले. ईडीने सोमवारी सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे आमदार जीवन कृष्णा साहा यांना अटक केली. पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील आमदाराच्या निवासस्थानी छापे टाकल्यानंतर केंद्रीय तपास यंत्रणेने त्यांना ताब्यात घेतले.

छाप्यादरम्यान आमदाराने भिंतीवरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यांचे फोनही घरामागील नाल्यात फेकून दिले. नंतर अधिकाऱ्यांनी हा फोन जप्त केला. छाप्याच्या व्हिडीओ आणि फोटोंमध्ये आमदार भिजत असताना ईडी आणि केंद्रीय राखीव पोलिस दल अधिकाऱ्यांनी झाडे, आणि कचरा पसरलेल्या परिसरातून घेऊन जात असल्याचे दिसत आहे. बुरवान विधानसभा मतदारसंघातील आमदाराला एजन्सीला सहकार्य न केल्याबद्दल मनी लॉंडरिंग



प्रतिबंधक कायद्याअंतर्गत अटक करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

आमदारांच्या काही नातेवाईक आणि सहकाऱ्यांच्या घरीही छापे टाकण्यात आले आहेत. साहा यांना २०२३ मध्ये केंद्रीय अन्वेषण ब्युरोने घोटाळ्यात सहभागी असल्याच्या आरोपाखाली अटक केली होती आणि नंतर त्यांची सुटका करण्यात आली. कोलकाता उच्च न्यायालयाने गट 'क' आणि 'ड' कर्मचारी, इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतचे सहाय्यक शिक्षक आणि प्राथमिक शिक्षकांच्या भरतीतील कथित अनियमिततांची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते.

ईडीने पश्चिम बंगालचे माजी शिक्षण मंत्री पार्थ चॅटर्जी, त्यांची कथित सहकारी अर्पिता मुखर्जी, तृणमूल काँग्रेसचे आमदार आणि पश्चिम बंगाल प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष माणिक भट्टाचार्य यांच्यासह काही इतरांना या प्रकरणात अटक केली होती. ईडीने अटक केल्यानंतर तृणमूल काँग्रेसने चॅटर्जी यांना निलंबित केले. तपास यंत्रणेने आतापर्यंत या प्रकरणात चार आरोपपत्रे दाखल केली आहेत.

# रोश व मल्टिपल स्क्लेरोसिस सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने आजारा संदर्भात जनजागृती उपक्रम

जगभरात कोट्यवधी लोक आणि भारतात सुमारे 2 लाख नागरिक मल्टिपल स्क्लेरोसिस या जीवनमर्यादित करणाऱ्या न्यूरोलॉजिकल आजाराशी झुंज देत आहेत. हा आजार रुग्णांच्या सेंट्रल नर्व्हस सिस्टीमवर परिणाम करून, चालणे, स्वयंपाक करणे, आंघोळ करणे किंवा लेकराला उचलण्याइतकी ताकद राखणे अशा दैनंदिन जीवनातील अगदी साध्या कामांपासूनही त्यांना वंचित करतो. त्यांच्या या रोजच्या झुंजी बहुतेक वेळा अदृश्य राहतात आणि सामान्य कामेसुद्धा अदृश्य पर्वत सर करण्यासारखी कठीण भासतात.




एम.एस. रुग्णांवर असलेला ताण-संघर्ष बाहेरून दिसत नाही किंवा सहज जाणवत नाही. या आजाराकडे समाजाचे लक्ष वेधण्यासाठी रोश फार्मा इंडिया व मल्टिपल स्क्लेरोसिस सोसायटी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने "वॉक इन माय शूज" हा जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून या जीवनमर्यादित न्यूरोलॉजिकल आजाराशी सामना करणाऱ्या रुग्णांच्या बहुतेक वेळा अदृश्य राहणाऱ्या संघर्षांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**जनआरोग्य**

#WalkInMyShoes या विशेष सिम्युलेशन झोनला भेट द्या आणि एम.एस. रुग्णांचे जगणे कसे असते, हे प्रत्यक्ष अनुभवून पहा. हा झोन 22 ते 26 ऑगस्ट दरम्यान मुंबई फिनिक्स मार्केटसिटी, कुर्ला (एट्रिअम 5, एलजी मजला), येथे उपलब्ध असेल. 20 ते 25 ऑगस्ट दरम्यान बेंगळुरूमधील ब्रूकफिल्ड इकोस्पेस पार्क, बेलांदूर (1C जवळ) आणि 22 ते 26 ऑगस्ट दरम्यान सिलेक्ट सिटी वॉक मॉल (H&M विंग, तळमजला), साकेत, नवी दिल्ली येथे सिम्युलेशन झोनलाही भेट देता येईल. या सिम्युलेशन झोनद्वारे भेट देणाऱ्यांना 'अनुभवातून शिक्षण' या पद्धतीने एम.एस. रुग्णांच्या संघर्षांची जाणीव करून दिली जाईल. यात चार प्रमुख लक्षणांचा संवेदनात्मक अनुभव दिला जाणार आहे – संतुलन हरवणे, स्नायूंच्या हालचालींवर परिणाम, अस्पष्ट दिसणे आणि संवेदनाशक्ती कमी होणे. या माध्यमातून एम.एस. रुग्णांना दररोज भेडसावणाऱ्या कठीण प्रसंगांचा जवळून वेध घेता येईल.एम.एस. बद्दल समाजातील जागरूकता वाढविणे आणि नागरिकांना पुराव्यावर आधारित आरोग्य माहिती समजून घेऊन त्यावर कृती करण्यास सक्षम बनवणे, हा या डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रमुख उद्देश आहे.

आरोग्यम् धनसंपदा

# प्रतिकारशक्ती वाढविणारे आरोग्यदायी तीळ



आपल्या खाद्यपदार्थांमध्ये तिळाला फार पूर्वीपासून अतिशय महत्व आहे. त्यामुळेच स्वयंपाक घरामध्ये तिळाचा वापर हमखास केला जातो. कित्येक लोक या तिळाच्या चविष्ट पदार्थांसाठी आणि तिळाच्या औषधी गुणांमुळे याचे सेवन करतात. परंतु, अनेकांना तिळाच्या औषधी गुणांविषयी माहिती नाही. तिळाचे सेवन केल्याने आपले शरिर हेल्दी राहण्यास मदत मिळते शिवाय अनेक पोषणतत्वे आपल्याला मिळतात.

तिळामध्ये भरपूर प्रमाणात पोषणतत्वे असतात. त्यामुळे तिळाला आरोग्यासाठी लाभदायी मानले जाते. 3 चमचे किंवा 30 ग्रॅम तिळामध्ये जवळपास 5 ग्रॅम प्रथिने असतात. तुम्हाला हे माहित असेलच की, प्रथिने ही आपल्या शरिरासाठी किती आवश्यक असतात. प्रथिने वेट लॉस आणि मसल्स गेन करण्यामध्ये ही मदत करतात.

आजकाल ऑस्टियोपोरोसिस ही समस्या अनेक लोकांमध्ये पहायला मिळते. ही समस्या होण्यामागील कारण म्हणजे हाडे कमजोर असणे होय. वयाच्या 35 वर्षांनंतर हाडांचे मांस कमी होऊ लागते आणि हाडे कमजोर होण्यास सुरुवात होते. जर तुम्ही तिळ बारीक करुन खाल्ले आणि बिना बारीक करता खाल्ले तर त्याची न्यूट्रिशन व्हॅल्यू बदलते. हाडांना मजबूत करण्यासाठी तिळामध्ये पोषणतत्वांचे प्रमाण भरपूर असते.जर तुम्हाला शरिरावर सूज आली असेल तर तिळाच्या सेवनाने ही सूज काही प्रमाणात कमी होते किंवा या सूजेपासून आपल्याला आराम मिळतो. तिळामध्ये झिंक, सेलेनियम, कॉपर, आयरन, व्हिटॅमिन बी 6, व्हिटॅमिन ई हे मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# तुमची नोकरी जाणार नाही? AI फक्त ३०% काम करू शकतो, उर्वरित माणसांवरच अवलंबून

**MIT च्या रिपोर्टमधून धक्कादायक खुलासा**

नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) च्या एन्ट्रीनंतर जगभरातील कंपन्यांनी या तंत्रज्ञानावर प्रचंड मोठी गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. मात्र, या संदर्भात नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालाने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. कंपन्या AI वर मोठी गुंतवणूक करत असल्या तरी, त्यांचे तब्बल ९५ टक्के पायलट प्रोजेक्ट्स अयशस्वी ठरले आहेत किंवा अजूनही सुरुवातीच्या टप्प्यातच अडकले आहेत.




मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) ने 'The GenAI Divide: State of AI in Business 2025' नावाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, कंपन्यांनी जनरेटिव्ह AI कडून महसुलात झपाट्याने वाढ होण्याची अपेक्षा ठेवली होती, परंतु ही अपेक्षा पूर्ण होताना दिसत नाही. AI मुळे कंपन्यांचा महसूल वेगाने वाढेल, असा जो अंदाज होता, तो पूर्णपणे फोल ठरला आहे. शक्तिशाली नवीन मॉडेल्स वापरूनही केवळ ५ टक्के AI पायलट प्रोग्राम्स यशस्वी झाले आहेत. कंपन्यांनी AI स्वीकारण्यात घाई केली, पण त्याचा खरा फायदा मोजक्याच कंपन्यांना झाला आहे.

या मोठ्या अपयशामागे अवास्तव अपेक्षा, चुकीच्या पद्धतीने केलेले इंटिग्रेशन आणि कंपन्यांच्या विशिष्ट गरजेनुसार AI प्रणाली न स्वीकारणे ही प्रमुख कारणे असल्याचे अहवालात म्हटले आहे. या अहवालानंतर, AI इंडस्ट्री म्हणजे केवळ एक 'बुडबुडा' आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या काही वर्षांपासून चॅट जीपीटी, क्लॉड आणि जेमिनी सारखी AI टूल्स कामाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडवतील, असे सांगितले जात होते. स्वयंचलित पद्धतीने मजकूर तयार करण्यापासून ते ग्राहक सेवा चॅटबॉट्सपर्यंत, प्रत्येक क्षेत्रात AI खर्च कमी करून उत्पादकता वाढवेल, असा अंदाज होता. मात्र, एमआयटीच्या संशोधनात लोकांच्या अपेक्षा आणि व्यवसायांना मिळालेले प्रत्यक्ष परिणाम यात मोठी तफावत असल्याचे दिसून आले आहे.

# बुलंद शहरमध्ये भीषण अपघात
## भाविकांच्या ट्रॅक्टरला कंटेनरची धडक, 8 ठार, 40 जखमी

बुलंदशहर, दि. २५ वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथे सोमवारी राष्ट्रीय महामार्ग ३४ वर भीषण अपघात झाला. राजस्थानमधील गोगामेडी येथे दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला एका भरधाव कंटेनरने मागून जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत दोन मुलांसह आठ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ४० जण गंभीर जखमी झाले आहेत.

बुलंदशहरचे पोलीस अधीक्षक डॉ. तेजवीर सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, कासगंज जिल्ह्यातील सोरो पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रफायदपूर गावचे सुमारे ६० भाविक रविवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास ट्रॅक्टर-ट्रॉलीमधून राजस्थानच्या हनुमानगढ जिल्ह्यातील प्रसिद्ध गोगामेडी मंदिराच्या दर्शनासाठी निघाले होते. त्यांचा ट्रॅक्टर बुलंदशहरच्या अरनिया पोलीस ठाणे क्षेत्रातील घटाल गावाजवळ पोहोचला असता, मागून वेगाने आलेल्या एका कंटेनर ट्रकने ट्रॅक्टर-ट्रॉलीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, ट्रॉलीमध्ये बसलेले सर्व भाविक हवेत फेकले जाऊन रस्त्यावर पडले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सरकारी रुग्णवाहिका आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना खुर्जा येथील कैलास रुग्णालय, मुनी सामुदायिक आरोग्य केंद्र आणि जटिया रुग्णालयात दाखल केले. बुलंदशहरचे एसएसपी दिनेश कुमार सिंह यांनी सांगितले की, ट्रॅक्टरमध्ये ५० ते ६० भाविक होते आणि हे सर्वजण जाहरवीर (गोगाजी) यांच्या दर्शनासाठी गोगामेडीला जात होते. जखमींपैकी २९ जणांना कैलास रुग्णालयात, १८ जणांना मुनी आरोग्य केंद्रात आणि १० जणांना जटिया रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान कैलास रुग्णालयात डॉक्टरांनी दोन मुलांसह सहा जणांना मृत घोषित केले, तर मुनी आरोग्य केंद्रात दोन जणांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले. या घटनेमुळे रफायदपूर गावावर शोककळा पसरली असून, पोलीस कंटेनर चालकाचा शोध घेत आहेत.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**